CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, १९ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ‘सनातन राष्ट्र शंखनाद’ महोत्सव : २० हजारांच्या उपस्थितीत ‘सनातन राष्ट्र संकल्प धर्मसभा’

## समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करावे लागेल ! : प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज




**तभा वृत्तसेवा,**
**फोंडा, गोवा**

केवळ जप करत बसलो, तर काम होणार नाही. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले होते, ‘माझे स्मरण कर पण युद्ध कर !’ स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे आपल्या देशावर काळ्या इंग्रजांची सत्ता होती. आपला देश धर्मशाळा बनला आहे. आता समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करण्याची आवश्यकता आहे. सनातन धर्माच्या आड येणार्या कायद्यांमध्ये पालट करून देशात कोणते कायदे हवेत, यावर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सनातन धर्माच्या प्रसाराचे कार्य ही साधना, ईश्वराची उपासना आहे. आपण आपल्या व्यक्तीत्वाची बाजी लावून आणि संघटित होऊन परमात्म्याच्या सेवेत स्वतःला अर्पण केले पाहिजे. तर स्वर्णिम काळ दूर नाही, असे मार्गदर्शन श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी यांनी केले. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक हिंदू उपस्थित होते.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे.

महोत्सवातील ‘सनातन राष्ट्र संकल्प’ सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर सनातनचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष श्री. सतीश महाना, ‘सनातन बोर्ड’चे प्रणेते पू. देवकीनंदन ठाकूर, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत पू. रवींद्र पुरी महाराज, आचार्य महामंडलेश्वर अनंत श्री विभूषित श्री श्री १००८ स्वामी बालकानंद गिरीजी महाराज, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता अश्विनी उपाध्याय, अयोध्या येथील सिद्धपीठ हनुमान गढी मंदिराचे महंत राजूदासजी महाराज, इंडोनेशिया येथील धर्मस्थापनम् फाऊंडेशनचे पू. धर्मयशजी महाराज, स्वामी आनंद स्वरूप आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. दर्शक हाथी हे उपस्थित होते. या वेळी मान्यवरांमध्ये सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांचीही उपस्थिती होती.

प.पू. गोविंददेवगिरीजी महाराज पुढे म्हणाले, ‘‘सनातन संस्थेचे संपूर्ण कार्य आध्यात्मिकतेच्या पायावर उभे आहे. भारत राष्ट्राला एक समजून काम करत आहेत. भगवद्गीता युद्धाच्या भूमीवर सांगितलेला ग्रंथ आहे. सनातन संस्थेनेही या ग्रंथाप्रमाणेच अध्यात्मापासून युद्धापर्यंत जागृती केली आहे. मी या महोत्सवामध्ये युद्धकलांचे प्रदर्शन पाहिले. मला वाटते की देशातील सर्व संतांनी त्यांच्या शिष्यांना हे शिकवले पाहिजे.’’

# बंजारा संस्कृती संशोधन केंद्रासाठी २५ एकर जमीन देण्याची मागणी

**छत्रपती संभाजीनग/प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे केसापुरीतांडा येथील गट क्र. २१ सह अनेक गटांतील शेतजमीन लघु पाझर तलावासाठी शासनातर्फे अंदाजे ५५ वर्षापूर्वी संपादीत करण्यात आलेली आहे. सुमारे २७५ एकर जमिनीतील ५० ते ६० एकर शिल्लक (गाळपेऱ्याच्या) जमिनीतून बंजारा समाजाचे श्रध्दास्थान व दिल्ली येथील रायसिना परिसराचे मूळ मालक लखीशा बंजारा यांच्या नांवाने राष्ट्रीय बंजारा संस्कृती संशोधन केंद्र व राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी २५ एकर जमीन देण्याची मागणी गुरूवारी, १५ रोजी ऑल इंडिया बंजारा टायगर्सतर्फे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बंजारा समाजबांधव भाजपासोबत असून, बंजारा समाजाच्या सर्व समस्या सोडवून घेण्यासाठी ऑल इंडिया बंजारा टायगर्स लोकशाही मार्गाने सतत प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील देवगिरी किल्ला परिसरात केसापुरीतांडा वसलेले



आहे. याच परिसरात ५५ वर्षापूर्वी झालेल्या लघु पाझर तलावासाठी २७० ते २७५ एकर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. यापैकी गाळपेऱ्याची ५० ते ६० एकर पाटबंधारे विभागाची शिल्लक जमीन पडीक आहे. या शिल्लक जमिनीतून बंजारा समाजाचे श्रध्दास्थान आणि दिल्ली येथील रायसिना परिससराचे मूळ मालक लखीशा बंजारा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संस्कृती संशोधन केंद्र व राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी संबंधित विभागाकडून २५ एकर जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी शिष्टमंडळाने केली आहे.

# प्रतिकूल परिस्थितीतील धाडस: २६ नोव्हेंबर

**छत्रपती संभाजीनगर -**

सध्याच्या अनिश्चितता आणि अशांततेच्या वातावरणात, भारतातील नाट्यक्षेत्राला अभूतपूर्व आव्हानांचा सामना करावा लागत आहे. विशेषतः भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाचे सावट आणि अशांत राजकीय वातावरण याची चित्रपटसृष्टीवरही सावली पडली आहे. प्रेक्षक त्यांच्या टेलिव्हिजन स्क्रीनला खिळून ताज्या बातम्या ऐकत असताना, २६ नोव्हेंबर या बहुप्रतिक्षित मराठी चित्रपटाच्या प्रदर्शनाची उत्सुकता मात्र सध्याच्या सामाजिक तणावाने वेढून गेली आहे.

२६ नोव्हेंबर हा केवळ एक चित्रपट नाही; तर ते आपल्या सामाजिक जाणिवेच्या रचनेत विणलेले एक धाडसी कथानक आहे. या चित्रपटाद्वारे दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण करणारे दिग्दर्शक सचिन उराडे दिग्दर्शित तसेच चैतन्याने भरलेली दुकल अनिलकुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित हा चित्रपट गरिबी, भ्रष्टाचार, नोकरशाहीतील अस्वस्थता आणि समाजात आपल्या संविधानाबाबत असलेले भयानक अज्ञान अशा अनेक महत्त्वाच्या समस्यांवर प्रकाश टाकतो. देशात २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान लागू झाले. या चित्रपटाचे निर्माते हा दिवस स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाप्रमाणेच आदराने साजरा करण्याची आकांक्षा बाळगतात आणि तो संविधान दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रदर्शित करतात.

# वीजग्राहकांच्या सेवेसाठी महावितरणचे ‘ऊर्जा’ चॅटबॉट २४ तास उपलब्ध

## विविध माहिती देण्यासह तक्रार नोंदविण्यासाठी होत आहे मदत

**छत्रपती संभाजीनगर :**

महावितरणने राज्यातील ३ कोटी वीजग्राहकांसाठी घरबसल्या एका क्लिकवर सर्व सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश) वापर करून वीजग्राहकांच्या संवादपर मदतीसाठी ‘ऊर्जा’ चॅटबॉट महावितरणची वेबसाईट व मोबाईल पवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. इंग्रजी व मराठी भाषेतील या चॅटबॉटद्वारे महावितरणच्या विविध सेवांबाबत ग्राहकांना प्रश्न विचारता येत आहे तसेच नवीन वीजजोडणी, वीजबिल भरणा, तक्रार निवारण आदींबाबत माहिती घेण्याची सोय उपलब्ध आहे.

म हा वि त र ण च्या वीजसेवेसंदर्भात माहिती कुठे विचारावी आणि या सेवांचा घरबसल्या लाभ कसा घ्यावा हा प्रश्न आता संपुष्टात आला आहे. ग्राहकसेवांबाबत थेट प्रश्न विचारून विविध सेवांचा लाभ व तक्रारी नोंदविण्यासाठी ‘ऊर्जा’ नावाचे चॅटबॉट महावितरणच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने विकसित केले आहे. राज्यातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी व इतर ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर ‘ऊर्जा’ चॅटबॉट ‍. ारहरवळीले.ळप ही वेबसाईट व महावितरणच्या मोबाईल पवर उपलब्ध आहे. नवीन वीजजोडणी वा त्यासाठी केलेल्या अर्जाची सद्यस्थिती, वीजबिल भरणा किंवा वीजबिलाचा तपशील, जलद वीजबिल भरणा, मोबाईल क्रमांक व ई-मेलची नोंदणी इतर विविध शुल्कांचा ऑनलाइन भरणा, स्वतः मीटर वाचन व सबमिशन, गो-ग्रीन नोंदणी, वीजवापर व बिलाचे कॅलक्युलेटर आदींबाबत वीजग्राहकांना ‘ऊर्जा’ चॅटबॉट थेट मदत करीत आहे.

महावितरणच्या वीजसेवेबाबत माहिती हवी असल्यास ‘ऊर्जा’च्या माध्यमातून संबंधित सेवा ग्राहकांसाठी थेट ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. संबंधित सेवेची थेट लिंक ग्राहकांना या बॉटमधूनच मिळणार आहे. यासोबतच वीजपुरवठा खंडित होणे तसेच वीजबिलांसह इतर तक्रारींबाबत संपूर्ण माहिती वीजग्राहकांना उपलब्ध होत आहे. यामध्ये तक्रार करण्यासाठी महावितरणचे २४ तास सुरू असलेले टोल फ्री क्रमांक, ‘एसएमएस’ क्रमांक, ई-मेल, मिस्ड कॉल सेवा आदींची माहिती बॉटद्वारे उपलब्ध आहे.

गेल्या वर्षभरापासून कार्यान्वित असलेल्या ‘ऊर्जा’ चॅटबॉटचा वीजग्राहक मोठ्या संख्येने वापर करत असून त्यांना वीजसेवा किंवा तक्रारी नोंदवण्याबाबत माहिती घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयांमध्ये जाण्याची आता आवश्यकता उरलेली नाही. मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेल्या ग्राहकांना मोबाईल क्रमांक किंवा ग्राहक क्रमांक सबमिट करून विविध सेवा घेण्यासाठी चॅटबॉटद्वारे महावितरणशी संवाद साधता येईल. तसेच इतर ग्राहकांना विविध सेवेचा लाभ घेता येत आहे.

# सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शिर्डी येथे घेतले साईदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**शिर्डी, दि. १८ मे -**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी आज शिर्डी येथे संतश्रेष्ठ साईबाबांचे दर्शन घेतले.

‘आज रविवार दि. १८ मे रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी शिर्डी येथे श्री. साईबाबा यांचे दर्शन तसेच साईबाबा समाधी मंदिरात श्रींचे पाद्यपूजन केले.

‘शिर्डी विमानतळ येथून नाशिकला जाण्यापूर्वी ते साई मंदिरात आले होते. मंदिर परिसरात आगमन होताच मुख्यकार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर ( खड) भिमराज दराडे, यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी द्वारकामाई, समाधी मंदिर व गुरुस्थान येथेही दर्शन घेतले. साई मंदिरात संस्थान अधिकाऱ्यांनी श्री साई मूर्ती , श्री साई चरित्र उदी प्रसाद आणि शाल श्रीफळ देऊन सरसंघचालकांचा सत्कार केला.

‘यावेळी सरसंघचालक भागवत यांनी आपल्या अभिप्रायात, ’ १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर भारताच्या नवोत्थानाचा पाया या नात्याने भारतभर समाजाचे प्रबोधन, अध्यात्म तत्व आणि व्यवहार या मूलभूत घटकाचे ज्या ईश्वरीय योजनेने झाले त्याचा एक भाग म्हणजे शिर्डीचे साईबाबा होत. देह त्यागानंतरही त्यांची तपस्या अनेकांना पथ दर्शक ठरते ही प्रचिती आहे. अशा श्री बाबांचा समाधी मंदिराचा नित्य कार्य विकास व त्याचे नित्य उत्तम व्यवस्थापन करणाऱ्या सर्व कार्यकर्ता मंडळींचे कृतज्ञतापूर्वक धन्यवाद. ’ अशा भावना व्यक्त केल्या.

‘यावेळी सराला बेटाचे महंत परमपूज्य श्री रामगिरीजी महाराज यांनी सरसंघचालक यांची सदिच्छा भेट घेतली.

# गुंडांचा माज उतरवणार, बोलणार कमी काम जास्त करणार-मनोज जरांगे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१८ मे**



किती दिवस आम्ही तरी शांत रहायचे? ही वाढती गुंडगिरी रोखण्यासाठी मीच पुढाकार घेणार आहे, असं मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हंटलं आहे.

परळीतील शिवराज दिवटे याला अमानुषपणे मारहाण करण्यात आलेली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. आज मनोज जरांगे यांनी स्वा.रा.ती. रुग्णालयात जाऊन शिवराज दिवटेची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. बीड जिल्ह्यात गुंडगिरीच्या माध्यमातून हल्ले होतच राहणार, आम्ही काय नुसतं भेटी देत फिरायचं? ही विदारक परिस्थिती दूर करण्यासाठी मी स्वत: पुढाकार घेईल असंही यावेळी जरांगे यांनी म्हंटलं आहे.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, सामूहिक कट रचून शिवराजला जीवे मारण्यासाठीच अपहरण करण्यात आलं होतं. मात्र लोक धावून आल्याने त्याचा जीव वाचला. त्याच्या अंगावरील मारहाणीचे वळ पाहून अंगावर काटा येतो. अशा घटना वारंवार घडूनही सरकार काहीच करत नाही. किती दिवस आम्ही तरी शांत रहायचं? बीड जिल्ह्यातील सर्व घराणे व सामाजिक क्षेत्रातील लोकांशी चर्चा करुन पुढचे पाऊल उचलण्याची वेळ आली आहे. गुंडांचा माज उतरवणार. यापुढे बोलणार कमी व काम जास्त करणार, असा सूचक इशाराच मनोज जरांगे यांनी दिला आहे.

(दरम्यान आज खा.बजरंग सोनवणे,आ.सुरेश धस,आ.धनंजय मुंडे यांनी शिवराज दिवटे यांची भेट घेतली.)

# उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ मे**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार उद्या सोमवार, दि. १९ मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे.

सकाळी ८:०५ वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण.

सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ९.०० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण.

सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी–बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण.

# आरोपी कोणीही असू द्या;संघटित हल्ला करणाऱ्यांवर मोक्का लावा–राजेसाहेब देशमुख

**शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटणार**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१८ मे**



मयत संतोष देशमुख पार्ट–२ करायचा अशा नीच मानसिकतेतून शिवराज दिवटे (रा.परळी वैजनाथ) या तरूणाचे शुक्रवारी संध्याकाळी अपहरण करून त्याला लाकूड, लोखंडी रॉड, कत्तीने मारहाण केली. डोक्यात बाटलीही फोडली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून काही जणांना अटकही केली आहे. असे समजते. आम्ही या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करतो आहोत. आरोपी हा कोणीही असू द्या, कोणत्या ही जाती–धर्माचा असू द्या संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून निरापराध लोकांवर भ्याड हल्ला करणाऱ्यांवर तात्काळ मोक्का लावा, अशा गुंडांची पोलिसांनी गावातून धिंड काढावी. त्यांचेवर कायद्याचा जरब बसवून अशा प्रवृत्ती ठेचून काढा. शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना, पोलिस आयुक्त व बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांना लवकरच भेटणार आहोत असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख म्हणाले की, बीड जिल्ह्यातील परळी येथे शुक्रवारी संध्याकाळी शिवराज दिवटे या तरूणाला एका टोळक्याने अपहरण करून त्याला रत्नेश्वर डोंगराच्या भागात नेले आणि बांबू, लाकडाने अमानुष व बेदम मारहाण केली, डोक्यात काचेची बाटली फोडली. या टोळीकडे लोखंडी रॉड आणि कत्तीसारखी घातक शस्त्रे असल्याचे ही समजते. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मारहाण झाल्यानंतर शिवराज हा गंभीर जखमी झाला होता. त्याला तात्काळ रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. या सगळ्या प्रकारानंतर शनिवार रोजी आम्ही जखमी शिवराज दिवटे व कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी शिवराजने आपल्याला लोखंडी रॉड आणि कत्तीने मारहाण झाल्याचे आम्हाला सांगितले. तसेच टोळक्यातील काहीजण, याचा संतोष देशमुख पार्ट–२ करायचा, असे म्हणत असल्याचेही शिवराजने सांगितले. खरे तर शिवराज हा जलालपूर येथे सप्ताहाच्या जेवणासाठी गेला होता.

# परळीत २० मे रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर सीटू कामगार संघटनेचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ मे**

महाराष्ट्र कामगार संयुक्त कृती समीतीच्या वतीने महाराष्ट्रव्यापी संप आहे. बीड जिल्हा सीटू कामगार संघटना संपात सहभागी होत आहे. त्या दिवसी परळी तालुक्यातील सीटूशी जोडलेल्या कामगार संघटना परळी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी १ वाजता भव्य मोर्चा काढणार आहेत.

राज्य सरकार व केंद्र सरकारचे कामगार विरोधी थोरणामुळे प्रचंड बेरोजगारी निर्माण झालेली आहे. आशा वर्कर व अंगणवाडी कर्मचारी यांना सरकारी कामगारांचा दर्जा मिळावा, खाजगीकरण थांबवावे, सरकारने कंत्राटीकरण थांबवावे, कामगारासाठीच्या चार कामगार संहीता मागे घ्याव्यात, कामगारांना किमान वेतन २६०००रु द्यावे: सर्व ६० वर्षावरील पेन्शन नसणाऱ्या सर्व नागरीकांना १०००० रु पेन्शन द्यावी.परळी तालुक्यातील आशाचे सर्व प्रकारचे थकीत मानधन द्यावे, घरेलू कामगार कल्याणकारी मंडळाने घरेलू कामगारांच्या पहिल्या दोन मुलांना शिष्यवृत्ती द्यावी, बांधकाम कामगारांचे सर्व प्रश्न तालुक्यातील डब्लूएफसी केंद्राने सोडवावेत. ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी ग्रामसेवकांनी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्यावे इत्यादी प्रमुख मागणीसाठी परळी तालुक्यातील बांधकाम कामगार, आशा, घरेलू कामगार असंघटित कामगार मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे. कामगारांनी मोठ्या संस्थेने मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहान आशाच्या नेत्या हेमा काळे, आशा लांडगे, किरण सावजी, सिटूचे जिल्हा अध्यक्ष प्रा.बी.जी खाडे, शेख जावेद, कामगारनेते जालिंदर गिरी, घरकामगार रोहिणी लोणीकर यांनी केले आहे.

# तिरंगा यात्रेने माजलगाव शहर दणाणले ;तिरंगा यात्रा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मे**

भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ माजलगाव शहरात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी नागरिक उत्साहात तिरंगा यात्रेत सहभागी झाले. नागरिकांच्या देशभक्तीपर घोषणांनी शहर दणाणून गेले.

देशाच्या सीमावर आपल्या जवानांनी दाखवलेला पराक्रमाचा त्यागाचा आणि शौर्याचा सन्मान व समर्पण दर्शवण्यासाठी ,व राष्ट्र प्रेमासाठी आणि ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डा नष्ट करून टाकले भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात घेण्यात आला. भारत मातेचे प्रतिमापूजन करून संभाजी महाराज चौकातून तिरंगा रॅलीला सुरुवात झाली. वंदे मातरम, भारत माता की जय, हिंदुस्थान जिंदाबाद अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. याप्रसंगी पाटिल गल्ली झेंडा चौक येथिल भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला व शहीद झालेल्या जवानांना दोन मिनिट श्रद्धांजली देण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या भव्य दिव्य मोटरसायकल तिरंगा रॅलीच्या प्रसंगी भाजपाचे सर्व नेतेगण पदाधिकारी कार्यकर्ते तसेच शिवसेना व राष्ट्रवादीचे पदाधिकारी व व्यापारी यांच्यासह रा. स्व. संघ, रोटरी क्लब व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या तिरंगा रॅलीचे प्रस्ताविक भाजपा शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी तर सूत्रसंचालन माजलगाव ता. भाजपा पात्रुड मंडलाचे अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके यांनी केले व उपस्थित असणाऱ्या सर्वांना तिरंगा रॅली काढून सैनिकांचे मनोधैर्य वाढावे व राष्ट्र प्रेमासाठी व ऑपरेशन सिंधू अंतर्गत आपल्या सशस्त्र दलाने पाकिस्तानातील दहशतवादी नष्ट करून टाकले या सह विविध माहिती देत अमरनाथ खुरपे यांनी मार्गदर्शन केले तर आभार प्रदर्शन कीट्टी आडगावच्या भाजपा ता. मंडल अध्यक्ष रूपाली कचरे यांनी केले.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ प्रशांत पाटील अरुण राऊत डॉ अशोक तिडके ज्ञानेश्वर मेंडके शिवसेना तालुका अध्यक्ष तुकाराम येवले अच्युतराव लाटे, संभाजीराव शेजूळ गोविंद बजाज प्रकाश दुगड शशीकिरण गडम अभय कोकड , बंडू खांडेकर, माऊली सरवदे प्रल्हाद दळवे सुरेंद्र रेदासनी शरद कचरे आनंत कुलकर्णी निरंजन वाघमारे सत्यनारायण उनवणे ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे पांडुरंग झोडगे उमेश जाधव राम शिंदे नवनाथ गायकवाड सुभाष साळवे सुभाष कांबळे खय्यम पठाण कल्याण शेप पवन मोगरेकर रमेश शेंडगे मनोज कोरडे नामदेव मुळे यासह विविध नेतेगण या सह अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मोठ्या उत्साहात तिरंगा यात्रेत सहभागी झाले होते.

# चर्चेतलं पुस्तक: नरकातील स्वर्ग



*शिवसेना नेते व संपादक संजय राऊत यांचे जेलवारीवर आधारित 'नरकातील स्वर्ग' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. नेहमीप्रमाणेच त्यांच्या मुलाखतीसारखेच हे स्फोटक पुस्तक वाचले. १ऑगस्ट २०२२ ते ९नोव्हेंबर २०२२ अशी एकशे एक दिवसांची जेलमधली जंत्री संजय राऊत यांनी या पुस्तकात मांडली आहे. पुस्तकाची सुरुवात २०१४ सालच्या मोदीयुगाच्या सुरुवातीपासून होते. तेव्हाचे मोदी हे अत्यंत विनम्र व अहंकारभाव नसलेले असे होते हा त्यांचा भाव होता. नंतर उद्धव ठाकरे आणि मोदी–शहा यांच्यात सत्तेसाठी बेबनाव झाला आणि भाजपाला स्वबळावर देश जिंकण्याचे स्वप्न पडले. १२५ जागा महाराष्ट्रात जिंकून सुद्धा भाजपा सत्तेपासून दूर गेला. राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस मिळून महाविकास आघाडीचे सरकार महाराष्ट्रात आरुढ झाले. या सरकारच्या स्थापनेस संजय राऊत हेच कारणीभूत आहेत हे भाजपा नेतृत्वाने कायम लक्षात ठेवले. पुढे चालू झाला पक्ष फोडण्याचा आणि सरकार पाडण्याचा कार्यक्रम. यात संजय राऊत सह अनेक शिवसेना नेत्यांवर इडीमार्फत दबाव आणून त्यांना उद्धव ठाकरे यांच्यापासून वेगळे करण्याचे डावपेच आखले गेले. बहुतांश सेनानेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाऊन उद्धव सेनेपासून लांब झाले नी पर्यायी मविआ सरकार पडले. हे सगळे ऑन रेकॉर्ड आहे. या फोडाफोडीत इडीचा गैरवापर झाल्याचे संजय राऊत यांचे सुरुवातीपासूनच म्हणने होते. शेवटी याच इडीने संजय राऊत यांना पत्रा चाळ प्रकरणी पीएमएलए (प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग क्ट) अंतर्गत अटक केली. संजय राऊत यांनी यात कसलेही मनी लॉन्डरिंग नसल्याचे सांगितले. शेवटी ही अटक बेकायदेशीर असल्याचे सांगत पीएमएलए कोर्टाने त्यांची जामिनावर सुटका केली त्यावर हायकोर्टानेदेखील शिक्कामोर्तब केले. ही अटक ते जामिन मिळेपर्यंतच्या काळाचा लेखाजोखा म्हनजे हे पुस्तक होय.*

अटकेची पटकथा पत्राचाळ पुनर्विकास केसने सुरु होते. खासदार असलेल्या संजय राऊत यांना पीएमएलए कायद्याच्या कलम ५० अंतर्गत अटक केले इतर कलमांसह. या कलमानुसार नुसत्या जबाबात जरी कुणाचे नाव आले तरी अटक करण्याचे अधिकार इडीला आहेत. हा कायदा करणारे पी.चिदंबरम यांना देखील याच कलमांतर्गत अटक केली होती. इडीने या कायद्याचा धाक दाखवून अनेकांना भाजपात प्रवेश घ्यायला लावला त्याची यादी भलीमोठी होईल. पण संजय राऊत त्यांना बधले नाहीत आणि अटक झाले. अटक करताना इडीने नोटांचे एक बंडल त्यांच्या घरातून काढून त्यांच्यासमोर धरले तेव्हा राऊत म्हणाले त्यावर जे लिहिलंय त्यासह पंचनामा करा कारण त्यावर लिहीलं होतं 'आयोध्या दौ–यासाठी..श्री. एकनाथ शिंदेकडून'. अटक केल्यावर इडी अधिकारी सारखे म्हणायचे हम तो कठपुतली है, उपर बात करो.उपर म्हनजे कोण याचे उत्तर कधीच मिळणार नाही. राऊत म्हनतात मी ना अमली पदार्थाचा तस्कर ना दहशतवादी. तरीही पत्रकार असणा–या संजय राऊतवर या कायद्याने कारवाई झाली. आधी भाजपातील हितचिंतक नेत्यांनी त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला पण ते बधले नाहीत. त्यांनी ८ फेब्रुवारीला उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू व २८ फेब्रुवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून इडी गैरवापर करत असल्याचे कळवले होते. पण याची कसलीही दखल घेतली गेली नाही असे ते म्हणतात. ९५% गैरभाजपा नेत्यांवर इडीने कारवाई केली असे त्यांचे म्हणने आहे. या पत्रात अगदी जितेंद्र नवलानीचा सुद्धा उल्लेख केला ज्याचे अनेक मुख्यमंत्री, मंत्री, आय.ए.एस., आय.पी.एस. अधिका–याशी जवळिकीचे संबंध होते.

संजय राऊत यांना अटक करताना त्यांची आई व कुटुंबिय यांनी खूप दिला असे ते सांगतात. भगवा गमजा फडकावत ते सामोरे गेले ते उल्लेखित करतात. आठ दिवसांच्या कस्टडीनंतर त्यांची रवानगी आर्थर रोड जेल मधे झाली. ही अटक टाळण्यासाठी शरद पवारांनी दोनदा नरेंद्र मोदींची भेट घेतली हे सांगतात. हा उल्लेख करतानाच गोधरा कांडाच्यावेळी मोदी–शहा यांना पवार व बाळासाहेब यांनी कशी मदत केली हे देखील विस्ताराने सांगतात. अगदी बाळासाहेबांनी संबंधित न्यायाधीशाला फोन लावून जे बोलले त्यातील शेवटचे वाक्य होते तुम्ही कोणत्याही पदावर बसलेले असा, पण तुम्ही हिंदू आहात हे विसरू नका. १ फेब्रुवारीला संजय राऊत यांना सरळ अमित शहांना फोन लावून विचारले की माझ्या मित्रांवर मुंबईत धाडी पडताहेत. मला टार्गेट करायचे असेल तर मी दिल्लीत आहे. इडीला सांगा आणि मला अटक करा. त्यावेळी अमित शहा म्हणाले संजय भाई, मुझे कुछ भी जानकारी नही है। मै देखता हूं। लगेच त्यांनी आशिष शेलार यांना फोन केला. पण शेवटी संजय राऊत यांना अटक झालीच.

आर्थर रोड जेलमधे मोठा व छोटा दरवाजा पार करून ते आत गेले तेव्हा त्यांना आठवण आली ते सदस्य असलेल्या जेलसमितीच्या काळातील व्हिजीटची. त्यावेळी आत प्रवेश करताच त्यांना आवाज आला खासदार साहेब नमस्कार!. तो आवाज होता दगडी चाळीचा डॉन अरुण गवळीचा. तिथेच दुसरा तरुण दिसला तो होता अबु सालेम. आता संजय राऊत आर्थर रोड जेलमधे कैदी म्हनून दाखल झाले होते. त्यांनाही इतर कैद्याप्रमाणे बूट, घडय़ाळ, जास्त कपडे, लुंगी, टॉवेल, दाढीचे सामान, पेन आतमधे नेता आला नाही. आत प्रवेश करताच १० नंबर वार्डात ते आले. तिथे त्यांना प्रविण राऊत, अविनाश भोसले, वाधवान, संजय छाब्रिया, गिरीश चौधरी, संजीव पालांडे ही प्रसिद्ध माणसे भेटली कैदीम्हणून. सगळी मंडळी त्यांना 'जय महाराष्ट्र ' करत होती. या वॉर्डच्या आत वॉकीटॉकीवर संदेश दिल्यावर दगडी भिंतीचा दरवाजा उघडून आत १२ नंबरची कोठडी होती. तिथे त्यांचे स्वागत केले माजी गृहमंत्री अनिल देशमुखांनी! ते म्हणतात 'कोर्टाने देशमुखांना घरचे जेवण नाकारले पण बेड दिला आणि त्यांना घरचे जेवण दिले पण बेड नाकारला'. तीन महिने ते जमिनीवरच झोपत. आतले दिनमान, जेवण, स्वच्छता, सोयीविषयी त्यांनी तपशीलवार वर्णन पुस्तकात दिले आहे. व्हि.आय.पी. असो की सामान्य ... कैद्यांसाठी जेल हा नरकच असतो. त्यामुळे बराकीतल्या नाल्या तुंबल्यावर संजय राऊत यांना पुस्तक लिहावंसं वाटलं आणि त्या अविनाश भोसलेंनी नाव सुचवलं नरकातील स्वर्ग . आणि संजय राऊतांनी तेच नाव ठेवलं या पुस्तकाचं.



नंतर पुढे 'आतली माणसं' या प्रकरणात अनिल देशमुख, एकनाथ खडसे यांचे जावई गिरीश चौधरी, नागपूरचे उईके बंधू, कॉक्स अँड किंग्ज चे पीटर केरकर, विविध फिल्मस्टार यांच्या केसचे वर्णन करतात. इडीला ते 'अल कायदा इडी' म्हणतात. त्यावर्षीचा गणपती, दसर, दिवाळी हे सण कसे गेले ते सांगतात.एकदा उद्धव ठाकरे यांनी त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली पण जेल मॅन्युअल मधे तशी तरतूद नसल्याचे सांगत भेट नाकारली. याचा अर्थ तुरुंग प्रशासन हे नियमावर चालते हे पटते. त्यांना आत असमान कोहली, शाहरुखपुत्र आर्यन खान , राज कुंद्रा हे पण दिसले जे ड्रग्ज क्ट खाली अटक होते. त्या कोठडीत सूर्यप्रकाश पोहोचण्याचा प्रश्नच नव्हता. पण भक्क लाईटचा उजेड चोवीस तास असे. 'अंडा सेल' कोणती हे मात्र त्यांना कळले नाही. जेलच्या बाजूला एक काळी गाडी होती ती प्रसिद्ध क्राईम रिपोर्टर जे. डे यांची होती . 'इडी म्हनजे भाजपाची शाखा' असा आरोप ते करतात. एनडीए आणि युपीए काळातील इडी कारवाई चा तुलनात्मक संख्यालेख ते पुस्तकात देतात. जेलमधल्या वेगवेगळ्या कैद्याच्या कहाण्या ते पुस्तकात सांगतात.

'कसाबचं भूत येथे आहे' या प्रकरणात ते ज्या कोठडीत होते तिथेच कसाबला ठेवले होते हे ते सांगतात. त्यांच्या बाजूला एक पॉश एसी बरॅक खास बनवून घेतली होती. ती लंडन जेलमधील आरोपी नीरव मोदी व विजय मल्ल्या यांच्यासाठी बनवली असल्याचे त्यांना समजले. त्याची शूटींग रोज करुन ते लंडन कोर्टाला पाठवले जायचे. लंडनला टेनिसपटू बोरिस बेकर जेलमधे होता. त्याचा आणि संजय राऊत यांचा अनुभव सारखाच होता . बेकर म्हणतो तुरुंगाने त्याला नम्र बनवले.तुरुंगात गेल्यावर आपल्याला कळते कोण तुमच्याबरोबर आणि कोण तुमच्याबरोबर नाही. कसाबच्या कोठडीचे डिझाईन जयंत पाटलांनी बनवलं ते इंजिनिअर होते आणि तत्कालीन गृहमंत्रीपण! ते कोठडी बॉम्ब प्रुफ बनवल्याचे सांगतात. पण आर्थर रोड जेलचे वातावरण कैद्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणारे आहे असे नीरव मोदीच्या वकिलांनी लंडन कोर्टात सांगितले होते. त्यांना कोर्टात एकदा उज्वल निकम पण भेटले होते.

अनेक राज्यात झालेली सत्तांतरे, प्रभावी नेत्यांवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप आणि कालांतरांने झालेले त्यांचे भाजपा प्रवेश ही स्थिती इडीचे अपयश आणि भाजपाचे यश दर्शविणारी आहे असा ते निष्कर्ष काढतात. 'पत्रं राखून ठेवली' या प्रकरणात त्यांनी उद्धव ठाकरेंचा केलेला एकेरी उल्लेख त्यांची जवळिकता दर्शविते. याशिवाय इतरही पत्रे पुस्तकात दिली आहेत. शेवटी आफ्रिकन गुंड कशी साखळी तयार करून रॅकेट चालवतात ते सांगितले आहे. 'बाहेरचा रस्ता' या प्रकरणात ते बाहेर कसे आले याची कथा सांगतात . आणि स्वत:च्या मैत्री या घरी आल्यावर त्यांना आठवतात त्या दोन नंबर बरॅकच्या बाहेर लिहीलेल्या ओळी.....

अपना अपना युद्ध सभी को
हर युग मे लढना पडता है।
और समय की शीलालेख पर
खुद को खुद गढना पडता है

**.....डॉ.अनिल बारकुल**
**एम.डी.( मेडिसिन)**
**फोन ९८५०५३५९०४**

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई
DNS Bank Ltd. Ambajogai

## ताबा सुचना
(अचल मालमत्ता)

ज्याअर्थी,
वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अमलबजावणी ॲक्ट –२००२ (दुसरा) अन्वये हस्ताक्षरकर्ता दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई. बँकेचा अधिकृत अधिकारी आहे, आणि सुरक्षा अधिकारी (अमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये बहाल केलेल्या अधिकाराचा वापर करून दिनांक २३.१२.२०२४ ला कर्जदार
१. मे. अवधुत पेट्रोलियम प्रोप्रा. किशोर सत्यनारायण उनवणे (कर्जदार)
पत्ताः–सोनाई निवास, हनुमान मंदिरजवळ, माजलगांव, जि. बीड ४३१ १३१
२. श्रीम. बायनाबाई भगवानराव उनवणे (सह–कर्जदार)
पत्ताः– सोनाई निवास, हनुमान मंदिरजवळ, माजलगांव, जि. बीड ४३१ १३१
३. श्री. पवार लहु हनुमान
पत्ताः– २२८, उत्तर बाजु, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळगाव, ता. गेवराई, जि.बीड ४३१ १२७
४. श्री. गोकुळ भगवानराव उनवणे
पत्ताः–मु.ब्राम्हणगाव, पो. माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड ४३१ १३१
५. श्री. सत्यनारायण भगवानराव उनवणे
पत्ताः–मु.ब्राम्हणगाव, पो. माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड ४३१ १३१
६. श्री. विष्णु भगवानराव उनवणे
पत्ताः–प्लॉट क्र.–ए–४९–५०, फ्लॅट क्र.–४, गट क्र.३२/२, साई संकुल, उत्तरा नगरी, ब्रिजवाडी, औरंगाबाद ४३१ ००१
यांचे नावाने नोटीस मध्ये नमुद केलेल्या रक्कम कर्जखाते क्र. ७००२–३३४ चे मुद्दल अधिक व्याज रु.६,८६,१३१/– (अक्षरीः सहा लक्ष शहाऐंशी हजार एकशे एकतिस रु.) अधिक चालु व्याज व कर्जखाते क्र.७०२३–६३ चे मुद्दल अधिक व्याज रु.५५,८३,२७५.५०/– (अक्षरीः पंचावन्न लक्ष त्र्याऐंशी हजार दोनशे पंच्याहत्तर रु. व पन्नास पैसे) अधिक चालु व्याजाची सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० (साठ) दिवसाचे आत फेड करण्याची डिमांड नोटीस कलम १३ (२) च्या अंतर्गत जारी करण्यात आली होती.
त्याअर्थी, कर्जदाराने रक्कमेची फेड न केल्याने दिनांक २७.०२.२०२५ तारखेच्या नोटीसनुसार सदर नियमाच्या ८ सह वाचल्या जाणाऱ्या सदर ॲक्ट कलम १३ (४) अन्वये हस्ताक्षरकर्ता अधिकाराचा वापर करुन खाली नमुद केलेल्या मालमत्तेचा ताबा दि. १६.०५.२०२५ रोजी वेळ दुपारी ०१:३० वाजता घेतला आहे. कर्जदार आणि साधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, या मालमत्तेचा व्यवहार त्यांनी करु नये. या मालमत्ते बरोबरचा कर्ज खाते क्र. ७००२–३३४ चे मुद्दल अधिक व्याज रु.६,८६,१३१/– (अक्षरीः सहा लक्ष शहाऐंशी हजार एकशे एकतिस रु.) अधिक चालु व्याज व कर्जखाते क्र.७०२३–६३ चे मुद्दल अधिक व्याज रु.५५,८३,२७५.५०/– (अक्षरीः पंचावन्न लक्ष त्र्याऐंशी हजार दोनशे पंच्याहत्तर रु व पन्नास पैसे) अधिक चालु व्याजाचा भरणा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा–माजलगाव बँकेला केल्यानंतर होऊ शकेल.
कर्जदार यांना असे सुचित करण्यात येते की, कलम १३ (८) नुसार विहित मुदतीमध्ये थकीत रक्कमेचा भरणा करुन बँकेकडे गहाणात असलेली मालमत्ता मुक्त करुन घेता येईल.

### अचल मालमत्तेचे वर्णन

कर्जखाते क्र. ७००२–३३४ व ७०२३–६३ शाखा–माजलगाव चे कर्जदार मे. अवधुत पेट्रोलियम प्रोप्रा. किशोर सत्यनारायण उणवणे (कर्जदार) व श्रीम. बायनाबाई भगवानराव उनवणे (सह कर्जदार) यांच्या कर्ज प्रकरणात श्रीम. बायनाबाई भगवानराव उनवणे यांच्या मालकीची मौजे माजलगांव ता. माजलगांव, जि. बीड येथील खालील मालमत्ता तारणात दिलेल्या आहेत
१. श्रीम. बायनाबाई भगवानराव उनवणे यांच्या मालकीची न.प. माजलगाव येथिल स.नं.३७५/३,मा.क्र.२६/६७९ असुन क्षेत्रफळ दक्षिण उत्तर ३३ फुट., पुर्व पश्चिम–१६.५ फुट क्षेत्र ५०.६० स्वे.मी. जागा व त्यावरील बाधकाम असुन ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:–
पुर्व:– भगवान खंडागळे
पश्चिम: पंडीतराव नाईकनवरे
दक्षिण:– शांतीलाल पानपट
उत्तर:– रस्ता (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)
२. श्रीम. बायनाबाई भगवानराव उनवणे यांच्या मालकीची न.प. माजलगाव येथिल स.नं.३७५/३, मा.क्र.२४/७००/१, असुन क्षेत्रफळ दक्षिण उत्तर ५० फुट, पुर्व पश्चिम–२५ फुट, क्षेत्र.११३ स्वे.मी. जागा व त्यावरील बांधकाम असून ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:–
पुर्व:– रामनाथ जोगडे
पश्चिम: अहमद मिस्त्री व पडुळकर
दक्षिण:– पंचफुलाबाई व शेळके
उत्तर:– रस्ता
(वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)
दिनांक :– १६.०५.२०२५
स्थळ:– माजलगाव, जि. बीड

(श्री. देशपांडे अनंत गोपाळराव)
अधिकृत अधिकारी (Secured Creditor)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई.
मो.क्र.९६६६६७७९००

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...




## विश्व हिंदू परिषदेच्या कार्याचा कार्यकर्त्यांना जवळून परिचय व्हावा यासाठी परिषद शिक्षा वर्गाचे आयोजन केले जाते-गोविंद शेंडे

**छत्रपती संभाजीनगर -**

आपण सर्वजण दहा दिवसीय परिषद शिक्षा वर्गात भाईंदर येथे आपल्या कार्याच्या वाढी संदर्भात चर्चा करण्यासाठी आला आहात. विश्व हिंदू परिषदेच्या कामात आपण जेव्हा नव्याने जबाबदारी घेतली तेव्हा आपणास सातत्याने समिती तयार करा, वेगवेगळे विविध प्रकारचे कार्यक्रम करा, धर्म रक्षा निधी एकत्र करा, आंदोलन करा, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन द्या असे सांगितले जाते याची मला कल्पना आहे.विश्व हिंदू परिषदेचेही समाजामध्येही गाय पकडणारे, लव जिहादच्या केसेस सोडवणारे,मंदिर अर्चक पुरोहित यांचे संरक्षण करणारे धर्म की रक्षा हम करेंगे हम करेंगे, गाय की रक्षा कोण करेगा हम करेंगे हम करेंगे अशा घोषणा देणारे अशी कार्यकर्त्याची प्रतिमा आहे. खरे पाहिले तर वर्षानुवर्ष विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्याला विश्व हिंदू परिषदेच्या कामाच्या परिचय होत नाही त्यामुळे विश्व हिंदू परिषदेने २००८ मध्ये परिषद शिक्षा वर्गाला सुरुवात केली यासाठी २००८ मध्ये माननीय अशोक जी सिंगल सह १५० कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली हरियाणा येथे सात दिवसाची बैठक संपन्न झाली या बैठकीत भविष्यात घ्यावयाच्या परिषद वर्गाच्या संदर्भात अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आणि पंधरा दिवसाचा वर्ग घ्यावयाचा हे निश्चित करण्यात आले

२००९ मध्ये पहिला वर्ग भोपाल मध्ये संपन्न झाला या वर्गात विश्व हिंदू परिषदेसह अन्य सर्व आयावांची विस्तृत माहिती कार्यकर्त्यांना देण्यात आली आणि त्यानंतर सतत दरवर्षी अशा प्रकारचे परीक्षेत शिक्षा वर्ग श्रेत्रशहा संपन्न होतात अशी माहिती मुंबई क्षेत्र प्रमुख गोविंद शेंडे यांनी दिली ते भाईंदर येथील परिसर शिक्षा वर्गाच्या समारोप प्रसंगी बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य कविता सिंग वर्ग प्रमुख श्री सतीश जी गोरडे वर्ग पालक संजय जी मुद्राळे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सौ कविता सिंग यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कामाचे कौतुक केले त्या म्हणाल्या आज या वर्गामध्ये महिला आणि पुरुष दोघेही दिसत आहेत स्वतःच्या घरची जबाबदारी सांभाळून महिलांनी स्वतःला सामाजिक कार्यात झोकून दिले आहे हे खूप कौतुकास्पद आहे विश्व हिंदू परिषदेचे काम जोमाने वाढण्याची आज गरज निर्माण झाली आहे मी या कामासाठी विश्व हिंदू परिषदेला शुभेच्छा देते.

या वर्गात ४ ते १४ मे या कालावधीत १० दिवसात बौद्धिक वर्ग चर्चा सत्र कृती सत्र चर्चासत्र याद्वारे विविध विषयाची माहिती शिक्षार्थी यांना देण्यात आली यानंतर श्री सतीश गोरडे यांनी परिषद शिक्षा वर्गाच्या दहा दिवसाच्या अहवालाचे वाचन केले ते म्हणाले या परिषद शिक्षा वर्गात १४१ पुरुष ३१ महिला असे १७२ शिक्षार्थी उपस्थित आहेत तसेच यांना प्रशिक्षण देण्यासाठी १९ शिक्षक उपस्थित आहेत.यामध्ये प्रामुख्याने २० शेतकरी ५३ व्यापारी ३५ नोकरी करणारे १० शिक्षक १ डॉक्टर ३ वकील ४ विद्यार्थी १ फार्मासिस्ट आणि अन्य ४५ अशी १७२ संख्या उपस्थित आहे दहा दिवसाच्या अभ्यासक्रमावर आधारित झालेल्या लेखी परीक्षेचे निकाल पालक संजय मुद्राळे यांनी घोषित केले समारोप कार्यक्रमात वैयक्तिक गीत अमोल पाठक यांनी तर अमृतवचन श्री वाल्हेकर यांनी सादर केले. सूत्रसंचालन वर्गाचे बौद्धिक प्रमुख राजीव जहागीरदार यांनी केले वर्गाच्या समारोप कार्यक्रमात क्षेत्र सहमंत्री रामचंद्र रामूका क्षेत्राच्या मातृ शक्ती संयोजिका डॉक्टर प्रतिभाताई बोथारे कोकण प्रांत उपाध्यक्ष श्री स्वदेश खेतावत श्री अरुणजी वर्मा श्री धर्मराज जी शुक्ला श्री ओमप्रकाश जी श्री अनिरुद्ध जी पंडित सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

## पैठण तालुक्यातील १२४ गावातील मालमत्तेचे पी आर कार्ड मिळणार

**तभा वृत्तसेवा**
**बिडकीन दि १८ मे -**

स्वामित्त्व योजने अंतर्गत पैठण तालुक्यातील जवळपास प्रत्येक गावातील गावठाण हद्दीतील मिळकत ,मालमत्ता धारकांना त्यांचे मालकी हक्काबाबत मालमत्ता पत्रक , मिळकत पत्रिका , पी. आर. कार्ड उपलब्ध करुन देणेची कार्यवाही भूमि अभिलेख विभागाकडून करण्यात येत आहे.यामध्ये पैठण तालुक्यातील प्रत्येक गावातील गावठाण हद्दीतील मिळकत धारकांच्या मिळकतींची ड्रोन प्रणालीद्वारे मोजणीची कार्यवाही पूर्ण करुन स्थानिक स्तरावर संबंधीत ग्राम पंचायत कार्यालयातील गाव नमुना नं.८ च्या प्राथमिक माहिती प्राप्त करुन घेऊन भूमि अभिलेख विभागामार्फत स्थानिक चौकशी करुन मालमत्ता धारकांना त्यांच्या मिळकतींचे मिळकत पत्रिका ,पी. आर. कार्ड तयार करुन वाटप करण्यात येत आहे.आपल्या पैठण तालुक्यातील एकुण १२४ गावांचा समावेश स्वामित्तव योजनेमध्ये करुन त्यांची ड्रोन प्रणालीद्वारे मोजणीची कार्यवाह पूर्ण करुन त्याआधारे आजअखेर ११२ गावांतील मिळकत धारकांच्या मालमत्तांचे सनद, पी.आर.कार्ड तयार करण्यात आले आहे. तयार झालेल्या एकुण गावांपैकी प्राप्त गावांतील सनद वाटपाचे काम उप अधीक्षक भूमि अभिलेख, पैठण कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. एकुण सनद प्राप्त झालेल्या गावांची संख्या आजरोजी ११२ एवढी असुन त्यापैकी बहुतांश गावात उप अधीक्षक भूमि अभिलेख, पैठण कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी स्वतः व्यक्तीशः हजर होऊन सनद वाटप करुन त्यापोटी शासनाकडुन निश्चित केलेली माफक सनद वसुली करुन ती शासन खाती जमा करीत आहे.पैठण कार्यालयातील कर्मचारी यांनी आजपर्यंत अंदाजे रक्कम रुपये ६,५०,००००/- (रक्कम सहा लाख पन्नास हजार रुपये मात्र) इतक्यात रकमाच्या सनदांचे वाटप प्रत्यक्ष गावात जाऊन केले आहे. उर्वरित वाटपाचे नियोजन कार्यालयातर्फे सुरु आहे.तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख, पैठण कार्यालयातील एकुण गावांचे वाटप ३ सज्जा कार्यालयात म्हणजे पैठण, बिडकीन व पाचोड या मध्ये हद्दी निश्चिती करुन गावं महसुली अधिकार अभिलेख हस्तांतरणाची कार्यवाही करणे म्हणजेच फेरफारची कार्यवाही सुरू झाली आहे गावांचे मालमत्ता पत्रक तयार करण्यात आलेले आहे.

# गंगापूर तालुक्यात अवैध वाळू वाहतूक

## वैजापूर चे उपविभागीय अधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड यांच्या गाडीवर हायला घालून वाळूतस्कराने केला जीवे मारण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**गंगापूर दि.१८ मे -**

उपजिल्हाधिकाऱ्यावर अवैध वाळूचा वाहतूक करणाऱ्याने मिनी हायवा चालकाने व मालकाने त्यांच्या गाडीवर गाडी घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन आरोपींना गंगापूर न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनवली आहे.




वैजापूर चे उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड हे आपल्या शासकीय वाहनातून लासुर स्टेशन कडे जात असताना त्यांना अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या मिनी हायवा क्र. एमएच २० जीसी ४७३५ हा जाताना दिसला. त्या वाहनाचा शुक्रवार (ता.१६) रोजी दुपारी तीन वाजता पाठलाग केला त्या वाहन चालकाने केला असता वाहन चालकाने वाहन थांबवणे ऐवजी ते वाहन उपजिल्हाधिकाऱ्याच्या गाडीवर घालण्याचा प्रयत्न केला. यावरून चार जणांविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात उपजिल्हाधिकारी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला होता.

त्यापैकी दोघेजण फरार झाले तर वसीम सलीम सय्यद (वय १९), मनोज कडूबाळ जगदाळे (वय २१) दोघे राहणार मेहबूब खेडा ता. गंगापूर या दोघांना गंगापूरच्या न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली. तर उर्वरित दोन आरोपी रितेश कडूबाळ जगदाळे व सोनू भवर हे दोघे आरोपी फरार असून त्यांचा पोलीस तपास करीत आहे.

## खुलताबाद येथील नगरपरिषदेने मुख्याधिकाऱ्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी राबवली स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**खुलताबाद, दि. १८ मे-**

खुलताबाद नगर परिषद, येथील नव्याने मुख्याधिकारी म्हणून आलेले शेख समीर यांनी खुलताबाद येथील न्यायालयाच्या समोरील रोडच्या कडेची शहरा चे प्रवेश द्वार वेरूळ चौफुली कॉर्नर परिसर त मोहिमेत स्वच्छ करण्यात आली प्लास्टिक घाण कचरा पाणी बॉटल आदी सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांनी जमा करून स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला .

, मुख्याधिकारी शेख समीर यांनी येणाऱ्या काळात प्रत्येक पंधरा दिवसांनी संपूर्ण नगरपरिषद कर्मचाऱ्यांना घेऊन खुलताबाद शहरात स्वच्छता मोहीम राबवणार असल्याचे सांगितले

शहरातील नागरिकांनी आपला कचरा ओला सुका हा आपल्या गल्ली परिसरात घंटागाडीत . ट्रॅक्टर मध्ये टाका व नगरपरिषद खुलताबाद येथील स्वच्छता विभागास नागरिकांनी सहकार्य करा असे आवाहन मुख्याधिकारी शेख समीर स्वच्छता विभागाचे स्वच्छता निरीक्षक श्रीहरी चौडेकर गणेश रोटे यांनी केले आहे



## सोयगाव शहरातील तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्यातर्फे गुणवंत विद्यार्थीचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोयगाव,दि.१८ मे -**

सोयगाव शहरातील तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्यातर्फे गुणवंत विद्यार्थी १० वी व १२ वी यांचा सत्कार करण्यात आला.सोयगाव येथील कृषिभूषण शेतकरी अरुण सोहनी यांची कन्या कु.शौर्यल सोहनी १० वी मध्ये दुसरा क्रमांक मिळवला व या सन्मानाचे मानकरी ठरली.जिल्हा असोसिएशन यांच्या वतीने सोयगाव येथील असोसिएशनचे सदस्य संजय शहापूरकर,दिनेश पंडित, अमोल पाखरे,विनोद सोहनी यांनी सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.यावेळी पत्रकार योगेश बोखारे, कृषीभूषण अरुण सोहनी,निधी सोहनी आदींसह उपस्थित होते.

# सोयगाव येथील समाजसेवक संजय शहापूरकर यांचा गौरव

**तभा.वृत्तसेवा**
**सोयगाव,दि.१८ मे**

सोयगाव कुपोषण कमी करण्यासाठी प्रयत्न करणारे समाजसेवक संजय शहापूरकर यांचा छत्रपती संभाजीनगर केमिस्ट ड्रगिस्ट असोसिएशनच्या वार्षिक सभेत गौरव करण्यात आला.

याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष नितीन देशमुख यांनी सांगितले की दुर्गम भागात जिल्हा केमिस्ट अँड रजिस्ट असोसिएशनच्या सहकार्याने सोयगाव शहरातील समाजसेवक संजय शहापूरकर यांनी आरोग्य शिबिर घेऊन कुपोषित बालकांना मोफत औषधी वाटप करीत आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील कुपोषण कमी झाले आहे.



केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव विनोद लोहाडे यांनी सांगितले कि अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी सोयगाव तालुका कुपोषण मुक्त व्हावा.यासाठी लोक सहभागातून हा उपक्रम सुरू केला.त्यामुळे अनेक बालके कुपोषण मुक्त झाली तसेच हा उपक्रम पुढेही सुरू राहणार आहे.

संजय शहापूरकर यांनी सांगितले की लोक सहभागातून वीस वर्षापासून कुपोषण कमी करण्यासाठी हा उपक्रम सुरू असून अनेक बालके साधारण श्रेणीत आली आहे.

याप्रसंगी अध्यक्ष नितीन देशमुख,उपाध्यक्ष नंदकुमार काळे, व सागर पाटील,सचिव विनोद लोहाडे,कोषाध्यक्ष निखिल सारडा सहसचिव किरण जोशी व सुनील देशमुख संघटन सचिव अमान उल्हाह सय्यद फार्मसी कौन्सिल चे मनोहर कोरे,दिलीप जैन,शेखर गाडे,दिनेश पंडित,अमोल पाखरे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा केमिस्टंट रजिस्ट असोसिएशनचे कार्यकारणी सदस्य तसेच जिल्ह्यातील विविध भागातील औषधी विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बिडकीन येथे भव्य तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**बिडकीन दि १८ मे-**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट करून टाकले. तसेच पाकिस्तानच्या संरक्षण दृष्ट्या अत्यंत महत्वाच्या ठिकाणांचेही या हल्लयात मोठे नुकसान झाले.

भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ दि १७ शनिवारी रोजी भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला,पैठण तालुक्यातील बिडकीन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अमर जवान ज्योती प्रतिमेचे पूजन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके व भाजप बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांचा हस्ते करण्यात आले.

तिरंगा रॅली ची सुरुवात, कोकण वेस मारुती मंदिर, सराफा गल्ली, मारवाडी गल्ली, बागवान गल्ली, मिरजगाव रोड या मार्गाने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते रॅलीत संघर्ष फिजिकल कॅडमी ,एनसीसीचे विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते, प्रसंगी गणेश काळे, रंगनाथ लगाने, चंद्रकांत हुड, दत्तात्रय बांडे, वकील सतीश हाडे, संतोष तोतला, अर्जुन भवर, आप्पासाहेब शेळके, बाबासाहेब सोकटकर सर, अविनाश राठोड,पोपट चुंगडे, गणेश दाणे, सुनील गडदे, अभिजित ढाकेफळे, गोकुळ कांबळे, कृष्णा वासुंदेकर, दीपक पानसरे, संतोष इंगळे, रवी जाधव, सुरेश भिसे, भागचंद कोथिंबीरे, बाबासाहेब धर्मे,शुभम औटी , मनोज राठोड,पुनम मुराडे, भागवत ठाकूर, संजय ठाणगे, मोहन हिवाळे, जीवन नरवडे, निलेश धडे,आदी गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## चार्जझोनसोबतच्या सहयोगाने पुणे-नाशिक महामार्गावर टाटा.ईवी मेगाचार्जर सुरू झाले

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे / नाशिक, १८झ मे -**

भारतातील सर्वात मोठा चार-चाकी ईवी उत्पादक आणि भारतातील एत क्रांतीत अग्रेसर असलेल्या टाटा.ईवी ने आज पुणे-नाशिक महामार्गावर आपल्या टाटा.ईवी मेगाचार्जरचे उद्घाटन करून ईवी समुदायाचा चार्जिंगचा अनुभव सुधारण्याच्या दिशेने एक लक्षणीय पाऊल उचलले. या कंपनीने फेब्रुवारी २०२५ मध्ये खुला सहयोग २.० फ्रेमवर्क अंतर्गत भारतातील सध्याचे चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर २०२७ पर्यंत दुप्पट करून ४००,००० चार्जिंग पॉईंट्सपर्यंत वाढविण्याचा आपला जो उपक्रम जाहीर केला होता, त्याच्याशी सुसंगत ही घडामोड आहे. दृष्टिक्षेपात चार्जर असणे, चार्जिंगची जलद गती आणि विश्वासार्हता याबाबत ईवी मालकांच्या मनात असलेल्या चिंतेचे निराकरण करण्यासाठी टाटा. ईवी ने देशभरात उच्च-गतीच्या, विश्वसनीय चार्जिंग स्टेशन्सचे को-ब्रँडेड टाटा.ईवी मेगाचार्जर नेटवर्क उभारण्यासाठी चार्जझोनशी भागीदारी केली आहे. या टाटा. ईवी मेगाचार्जर्सचा उपयोग सर्व ईवी करू शकतील, पण टाटा. ईवी च्या वापरकर्त्यांना काही विशेष लाभ मिळतील, जसे की चार्जिंग पॉइंटवर प्राधान्याने प्रवेश मिळेल आणि चार्जिंग दरावर २५% पर्यंत सूट मिळेल.

### नानावती मॅक्स हॉस्पिटलकडून लिव्हर ट्रान्सप्लांट प्राप्त जीवनयोद्ध्यांना मानवंदना

**नाशिक** - जीवन, संघर्ष आणि आशेचा उत्सव साजरा करत, मुंबईतील नानावती मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेजच्या रोटरॅक्ट क्लब आणि वुमेन ऑफ विज्डम (थेथ) नासिक यांच्या सहकार्याने नासिकमध्ये पहिल्या लिव्हर ट्रान्सप्लांट सपोर्ट ग्रुपचा यशस्वी शुभारंभ केला. या विशेष कार्यक्रमात २० हून अधिक लिव्हर ट्रान्सप्लांट प्राप्तकर्ता आणि डोनर्स यांना आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ व समाजातील मान्यवर व्यक्तींनी सन्मानित केले.

## सत्य घटनेवर आधारित शातिर The Beginning २३ रोजी प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर -**

तर ही वानरसेना तुझ्या सोन्याच्या लंकेची राख रांगोळी करेल, असा इशारा अट्टल गुन्हेगारांना देणारा शातीर चित्रपटाचा ट्रेलर सोशल मिडियावर नुकताच लॉन्च झाला आहे. या ट्रेलरमुळे आधीच चर्चेत असलेल्या या चित्रपटाबद्दल उत्सुकता निश्चितपणे वाढवली जाणार आहे. शातिर ढहश इशसळपपळपस हा मराठी येत्या २३ मे रोजी रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे.

सध्याच्या तरुणाईची कथा सांगणारा, सत्य कथेवर आधारित शातीर, द बिगिनिंग या चित्रपटाची निर्मिती श्रियांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्सच्या माध्यमातून रेश्मा वायकर यांनी केली आहे. या चित्रपटा द्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. सध्याच्या तरुण पिढीला पडलेला अमली पदार्थांचा विळखा, ड्रग्स माफिया आणि पोलीस यंत्रणेच्या संघर्ष, व्यसनाधीनता, गुन्हेगारी यांच्याविरुद्ध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उभारलेला लढा या चित्रपटात प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.

# मराठवाड्यातील पहिल्या अर्थोपेडिक वेलिस् रोबोटिक असिस्तेड सोल्युशन चे ना.अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर, १८ में २०२५:**

एमएमआरआय ट्रस्टच्या कमलनयन बजाज हॉस्पिटलने १०० पेक्षा जास्त गुडघ्याच्या बदलाचे शस्त्रक्रिया आणि १०० पेक्षा जास्त रोबोटिक सहास्थित शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. या क्षेत्रातील लोकांसाठी जागतिक दर्जाचे आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे एक मोठे यश आहे.

हॉस्पिटलभध्ये “ उद्द्धाटन रविवार, १८ रोजी कमलनयन बजाज नर्सिंग कॉलेज ऑडिटोरियम येथे राज्याचे




माननीयमंत्री, इतर मागासवर्ग, दुग्धविकास आणि नवीकरणीय ऊर्जाविभाग, तसेच छत्रपती संभाजीनगर (पूर्व) चे आमदार अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आहे या वेळी डॉ. अनुपम टाकळकर, अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर, विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

मराठवाडा आणि परिसरातील लोकांसाठी उच्च गुणवत्तेची व परवडणारी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या उद्दिष्टांशीही अत्याधुनिक रोबोटिक प्रणाली सुसंगत आहे. आता या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ स्थानिक पातळीवरच मिळणार असून, रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी मेट्रो शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही

याप्रसंगी बोलताना, डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, सीईओ, एमएमआरआय ट्रस्टच्या कमलनयन बजाज हॉस्पिटन, यांनी संपूर्ण वैद्यकीय टीम आणि समाजाचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, “हा टप्पा म्हणजे आमच्या क्षेत्रात जागतिक दर्जाचे वैद्यकीय तंत्रज्ञान आणण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. परवडणारी आणि उत्कृष्ट आरोग्यसेवा रुग्णांना देण्याचे आमचे ध्येय आहे, जे एमएमआरआय ट्रस्टच्या सेवा भावी विचारसरणीशी सुसंगत आहे.”

## प्रासंगिक

**राहुल गोखले**

# ‘वर्मा’वर बोट!

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या शासकीय निवासस्थानी १४ मार्चच्या रात्री आग लागली. ती विझविण्यासाठी दाखल झालेल्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना तेथे एका खोलीत मोठ्या प्रमाणावर जळालेल्या नोटा तसेच पोती भरून रोख रक्कम आढळली. त्या कर्मचाऱ्यांनी त्याचे चित्रमुद्रण (रेकॉर्डिंग) केले. दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय यांना याची माहिती देण्यात आली; तेव्हा त्यांनी त्वरित दिल्ली पोलिस महासंचालकांना त्याची सूचना दिली. त्यानंतर तपास अधिकारी न्या. वर्मा यांच्या निवासस्थानी गेले असता तेथून जळालेल्या नोटा आणि रोख रक्कम गायब झालेली आढळली. न्या. वर्मा यांनी तपास अधिकाऱ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली नाहीतच; पण त्यांची दिशाभूल होईल अशी माहिती दिली. या प्रकरणावरून देशभर काहूर उठणे स्वाभाविक होते. देशातील लहान-मोठ्या गुन्हेगारी प्रकरणांत न्यायाधीश निकाल देत असतात; पण न्यायाधीशांचा न्याय कोण करणार, असा सवाल उपस्थित झाला. न्या. वर्मा यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात तडकाफडकी बदली करण्यात आली असली, तरी त्याने मूळ प्रश्न अनुत्तरितच राहतो, अशी खंत देशभरात व्यक्त होत होती. अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने या सर्वच प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अंतर्गत समिती नेमली. त्या समितीने दिलेल्या अहवालानंतर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्या. वर्मा यांना राजीनामा देण्याची किंवा निवृत्ती स्वीकारण्याची सूचना केली. न्या. वर्मा यांनी त्या दोन्हीस नकार दिला. तेव्हा न्या. खन्ना यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना पत्र लिहून न्या. वर्मा यांना बडतर्फ करण्याची शिफारस केली आहे. त्याकरिता महाभियोग चालवावा लागेल. संसदच ती प्रक्रिया करू शकते.

न्यायाधीशांनी निष्पक्ष निकाल द्यावा अशी अपेक्षा असेल तर न्यायाधीश संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले असता कामा नये, ही किमान अपेक्षा झाली. परंतु राजीनामा न देऊन न्या. वर्मा यांनी अपेक्षाभंग केला आहे. महाभियोग चालविणे ही अतिशय प्रदीर्घ अशी प्रक्रिया आहे. कदाचित त्याचाच फायदा घेऊन न्या. वर्मा यांनी पदाला चिकटून राहणे पसंत केले असावे. यापूर्वीही काही न्यायाधीशांवर महाभियोग चालले आहेत; पण महाभियोगामुळे पदावरून पायउतार होण्याची वेळ आलेली नाही. न्या. वर्मा हे काही असे आरोप झालेले पहिलेच न्यायाधीश नव्हेत. ज्यांच्यावर महाभियोग प्रक्रिया सुरू करण्यात आली होती त्या सर्वांवरच काही आर्थिक भ्रष्टाचाराचे आरोप नव्हते. उदाहरणार्थ; २०१५ साली हार्दिक पटेलवरील देशद्रोह खटल्यात सुनावणीदरम्यान गुजरात उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश पारडीवाल यांनी देशाच्या प्रगतीत अडथळे निर्माण करणाऱ्या दोन बाबी म्हणजे आरक्षण आणि भ्रष्टाचार असे विधान केले होते. त्यावरून राज्यसभेच्या ५८ सदस्यांनी तत्कालीन राज्यसभा अध्यक्ष हमीद अन्सारी यांच्याकडे न्या. पारडीवाल यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याचा प्रस्ताव सादर केला. अर्थात पारडीवाल यांनी काही तासांतच आपल्या निकालपत्रातून ते विधान काढून टाकल्यानंतर ते प्रकरण शमले आणि महाभियोग प्रक्रिया थांबविण्यात आली. तीच बाब मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. एस. के. गंगेले यांची. ग्वाल्हेर येथील एका कर्मचाऱ्याचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. २०१५ साली राज्यसभेच्या अध्यक्षांकडे ५८ खासदारांनी न्या. गंगेले यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव दिला. अध्यक्ष अन्सारी यांनी चौकशी समिती नेमली; पण त्या समितीला कोणताही ठोस पुरावा मिळाला नाही आणि न्या. गंगेले यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्ताव बारगळला. २०१८ साली सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या कार्यशैली विरोधात सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायमूर्तींनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर भूमिका मांडली आणि सर्वत्र खळबळ उडाली. देशात असा प्रसंग पहिल्यांदाच उद्‌भवला असावा, हेही त्याचे एक कारण होतेच. सात विरोधी पक्षांच्या खासदारांनी राज्यसभा अध्यक्ष व्यंकय्या नायडू यांना न्या. मिश्रा यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याचा प्रस्ताव दिला होता. तथापि, न्या. मिश्रा यांच्यावरील आरोप हे सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत व्यवस्थापनाशी निगडित आहेत; गैरव्यवहार किंवा गैरकारभाराशी नाहीत, असा निर्वाळा देत नायडू यांनी महाभियोग प्रस्ताव अमान्य केला.

मात्र, ज्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप झाले ते न्या. रामस्वामी हेही महाभियोगातून निसटले. ते पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असताना त्यांनी आपल्या सरकारी निवासस्थानाचे नूतनीकरण करण्यासाठी अव्वाच्या सव्वा खर्च केला असल्याची वृत्ते १९९० साली प्रकाशित होऊ लागली. घरातील फर्निचरपासून वातानुकूलित यंत्रे, गालिचे, सोफा यांवर त्यांनी वारेमाप खर्च केला होता. सरकारी वाहन खाजगी कामांसाठी वापरत असल्याचा आरोप झाला होता. अर्थात हे आरोप झाले त्यावेळी न्या. रामस्वामी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. तेव्हा तत्कालीन सरन्यायाधीश सब्यसाची मुखर्जी यांनी न्या. रामस्वामी यांना न्यायदानाच्या कामापासून दूर राहण्याचे निर्देश दिले. १९९१ साली नवव्या लोकसभेच्या विसर्जनापूर्वी १०८ खासदारांनी न्या. रामस्वामी यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याचा प्रस्ताव लोकसभा सभापतींना दिला. त्यानुसार चौकशी समिती नेमण्यात आली. मात्र तोवर निवडणुका झाल्या होत्या आणि पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार सत्तेत आले होते. तेव्हा तोच महाभियोग प्रस्ताव चर्चेला आला. सुरुवातीस काँग्रेसने आपल्या खासदारांना प्रस्तावावर आपल्या सदसद्विवेकबुद्धीनुसार मतदान करण्याची मुभा दिला होती; पण नंतर काँग्रेस खासदारांनी मतदानात भाग घेऊ नये, अशा सूचना दिल्या. परिणामी प्रस्तावाच्या बाजूने १९६ तर मतदानात भाग न घेतल्याची संख्या २०५ अशी होती. महाभियोग प्रस्ताव बारगळला. आता काँग्रेस न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेच्या कितीही आणाभाका घेत असली, तरी १९९३ साली काँग्रेसने भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या एका न्यायाधीशाला वाचवले होते, हे विसरून चालणार नाही. याच रामस्वामी यांनी नंतर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून आपला कार्यकाळ पूर्ण केला; पुढे ते राजकारणात उतरले आणि अण्णाद्रमुकचे उमेदवार म्हणून वायको यांच्याविरोधात १९९९ साली लोकसभा निवडणूक लढविली. ते पराभूत झाले हे खरे; पण भ्रष्टाचाराचे एवढे आरोप होऊनही त्यांच्या केसालाही धक्का लागला नाही, हे मात्र निश्चित. सिक्कीम उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असलेले न्या. दिनकरन यांच्यावरही २०११ साली भ्रष्टाचार आणि जमीन हडपण्याचे आरोप झाले होते. राज्यसभेच्या ७५ खासदारांनी महाभियोग प्रस्ताव दिला होता. त्यानंतर चौकशी समिती नेमण्यात आली होती. महाभियोग प्रस्ताव राज्यसभेत २०१२ साली चर्चेला येणार होता; त्यापूर्वीच न्या. दिनकरन यांनी राजीनामा दिला.

ज्यांच्यावर महाभियोग चालला असे न्यायाधीश म्हणजे कोलकाता उच्च न्यायालयाचे न्या. सौमित्र सेन. १९९३ साली दोन उद्योगांमधील वादावर सुनावणी न्या. सेन यांच्या न्यायालयात झाली. त्यानंतर तोडगा निघाला तरी न्या. सेन यांच्या बँक खात्यांत अचानक पैसे जमा झाल्याचे आणि ती रक्कम ३२ लाखांची असल्याचे उघडकीस आले. सरन्यायाधीश बालकृष्णन् यांनी स्थापन केलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल दिल्यानंतर न्या. बालकृष्णन् यांनी २००९ साली न्या. सेन यांच्याविरोधात महाभियोग चालविण्यात यावा, अशी शिफारस केली. राज्यसभा अध्यक्षांनी नियमानुसार समिती स्थापन केली. अखेरीस हा महाभियोग प्रस्ताव २०११ साली चर्चेला आला आणि १८९ विरुद्ध १७ मतांनी संमत झाला. त्यानंतर महाभियोग प्रस्ताव लोकसभेत चर्चेला जाणे अपेक्षित होते. पण बहुधा पुरेशी नामुष्की झाल्याची जाणीव झाल्याने न्या. सेन यांनी राजीनामा दिला. मात्र, त्याचा परिणाम त्यांच्या निवृत्तिवेतन व संबंधित लाभांवर झाला नाही. २०१२ साली माहिती अधिकाराखाली मिळालेल्या माहितीवरून हे स्पष्ट झाले. न्या. वर्मा यांनी पदावरून पायउतार होण्यास नकार देणे हे आश्चर्यकारक. बहुधा तसे केले तर आरोप मान्य केल्यासारखे होईल, असे भय त्यांना असावे. पण हे भय महत्त्वाचे की न्यायाधीश पदाची इभ्रत आणि नैतिकता जास्त महत्त्वाची हा कळीचा मुद्दा आहे. आपल्या देशाला रामशास्त्री प्रभुणेसारख्या निर्भय आणि निःस्पृह न्यायाधीशांचा वारसा लाभला आहे. ‘न्यायाधीशाचे मूल्यांकन केवळ त्याच्या निर्णयांच्या गुणवत्तेवरूनच होत नाही तर त्याच्या चारित्र्याच्या गुणवत्तेवरून केले जाते. न्यायाधीशाच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनातही निःस्पृहता दिसून आली पाहिजे’, असे २०१९ साली एका सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले होते. एका अर्थाने न्यायालयाने वर्मावरच बोट ठेवले होते. त्यामुळेच न्या. वर्मा यांच्यावर कोणती कारवाई होणार, याची प्रतीक्षा आहे. ▮

९८२२८२८८१९

## गुंतवणूक

**अजय वाळिंबे**

# भावनेने नव्हे, विचाराने निर्णय घ्यावा

जागतिक तसेच देश पातळीवर वेगवान घडामोडी घडताना शेअर बाजारात तरंग उठणे स्वाभाविक आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानदरम्यान उद्‌भवलेली युद्धजन्य स्थिती, त्यानंतरची शस्त्रसंधी बाजारावर परिणाम करून गेलीच, पण दरम्यानच्या काळातील चीन आणि अमेरिकेदरम्यान निर्माण झालेले आर्थिक मैत्र आणि दुसरीकडे भारत आणि इंग्लंडमधील मुक्त व्यापाराचे धोरण या सर्वांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तसेच भांडवली बाजारावर झालेला परिणाम अनुभवास आला.

लक्षात घेण्याजोगा पहिला आणि अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्दा म्हणजे परिस्थिती कोणतीही असली, तरी भारताचा विकास दर सातत्याने चांगला राहिला आहे. तो कधीही सहाच्या खाली आलेला नाही. म्हणजेच अमेरिकेचे बदललेले परराष्ट्र धोरण, त्यांनी लादलेले निर्बंध, मोठ्या कंपन्यांची बरी-वाईट कामगिरी, राजकारणातील अस्थिरता हे सगळे असूनही भारताचा विकास दर सहा ते सव्वा सहा टक्क्यांच्या आसपासच राहिला आहे. अनेक अर्थतज्ज्ञांनी विकास दर कायम राहण्याचे भाकीत वर्तविले आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या सरकारने आधीपासून उत्पादन आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांना महत्त्व दिले आहे. या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पातही यासाठी मोठा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार केला तर सरकारच्या या धोरणात सातत्य दिसून येते. त्यामुळेच वित्तीय तूट असूनदेखील भारत प्रगती करताना दिसतो. विकास कामांवर होणारा खर्च वाढवण्याचा तो दृश्य परिणाम म्हणता येईल. खेरीज पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप वाढवण्याचेही हे फलित आहे. म्हणूनच एखाद्या घटनेमुळे अल्पकालीन परिस्थितीमध्ये शेअर बाजारात चढउतार दिसले तरी दीर्घकाळाचा विचार करता भारतीय बाजारातील स्थिती मजबूत राहील, यात शंका नाही.

गेल्या काही दिवसांमध्ये जागतिक बाजारपेठेवर अनेक घटनांचा ताण होता. अजूनही आंतरराष्ट्रीय युद्धसदृश वातावरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ तणावाखाली आहे. मात्र आता रशिया-युक्रेनदरम्यान युद्धविराम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ही बाब दोन्ही देशांनी मान्य केल्यामुळे कदाचित परिस्थिती निवळू शकते. अलिकडेच आपण इंग्लंडबरोबर मुक्त व्यापार धोरणाचा मार्ग स्वीकारला. ही अत्यंत मोठी आणि महत्त्वपूर्ण बाब आहे, कारण व्यापारात या दोन्ही देशांचे शुल्क समसमान राहील. हे दर दोन्ही देशांच्या परस्पर संमतीने ठरवण्यात येतील. आपल्याला याचा निश्चितच मोठा फायदा होईल, कारण ‘ब्रेक्झिट’नंतर इंग्लड हा व्यापारीदृष्ट्या स्वतंत्र देश आहे. युरो हे त्यांचे चलन नाही. याचा फायदा आपल्याला मिळेल. आगामी काळात अन्य राष्ट्रांशीही आपले संबंध सुधारण्याची शक्यता आहे. हीच स्थिती कायम राहिल्यास अमेरिकेने कितीही नखरे दाखवले तरी भारतीय अर्थकारणावर फारसा परिणाम होणार नाही.

नुकतेच अमेरिकेने चीनवर लादलेले भरमसाट आयात शुल्क कमी करण्याचे सुतोवाच केले. अर्थात त्याची अंमलबजावणी होण्यासाठी काही काळ जावा लागेल. मात्र या घटनेचाही भारतावर अनुकूल परिणाम होताना दिसेल. अमेरिकेने चीनवरील टेरिफ ८० टक्क्यांपर्यंत खाली आणल्याचा एक परिणाम म्हणजे चीनकडून भारतीय बाजारात होणारे ‘डम्पिंग’ कमी होईल. अमेरिकेने ३०० वा ३४० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क वाढवल्यामुळे आत्तापर्यंत चीनला भारतीय बाजारात माल ओतत राहण्याखेरीज उपाय नव्हता. भारताची मोठी लोकसंख्या आणि मोठी बाजारपेठ



त्यांच्यासाठी महत्त्वाची होती. याचाच परिणाम म्हणून आताही ग्राहकांनी मुंबई वा अन्य मोठ्या शहरांमधील बाजारपेठेत फेरफटका मारल्यास चिनी उत्पादनांची भरताड दिसेल. सध्या त्यांच्या मालाने बाजार तुडुंब भरले आहेत. स्वाभाविकच उत्पादने अगदी नाममात्र किमतीत उपलब्ध आहेत. ग्राहकांसाठी ही समाधानाची बाब असेलही, पण त्यामुळे ‘मेक इन इंडिया’ मोहिमेवर विपरीत परिणाम होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच अमेरिका-चीन व्यापार धोरणांमधील सामंजस्याचा चांगला परिणाम होईल.


अमेरिकेच्या बदलत्या धोरणांमुळे जगाने ट्रेड वॉर अनुभवले. ते वाढण्याचा मोठा धोकाही होता. खरे सांगायचे तर, तो युद्धापेक्षा भयंकर होता. मात्र ट्रम्प यांनी थोडीफार माघार घेतल्यामुळे सध्या तरी याचा चांगला परिणाम बघायला मिळेल. सध्या तो बघायला मिळतही आहे. तणाव कमी होताच निर्देशांक २८०० अंकांनी वाढणे हे त्याचेच द्योतक म्हणावे लागेल. अर्थात यात सातत्य राहील की नाही हे कोणीही सांगू शकणार नाही. पण एक गोष्ट निश्चित की, सद्यःस्थिती भारतीय बाजारासाठी सकारात्मक आहे. गुंतवणूकदारांनी सावध राहून व्यवहार केले तर नुकसान संभवत नाही. युद्धजन्य स्थिती कायम राहिली असती तर गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक काढून घेतली असती. बँकिंग, ऊर्जा आणि पर्यटन क्षेत्राला याचा नकारात्मक परिणाम व्हायला लागलाच होता. या क्षेत्रातील कार्यरत कंपन्यांचे स्टॉक्स पडले होते. यातच सोन्याच्या किमती प्रचंड प्रमाणात वर गेल्या. जगातील अनिश्चितता सोन्याच्या किमतीतील वाढीला नेहमीच प्रोत्साहित करते. या सगळ्या पृष्ठभूमीवर गुंतवणूकदारांनी भावनेवर निर्णय न घेता संयमाने कृती करणे गरजेचे आहे, असे वाटते. सध्या लोकांनी मूल्याधारित गुंतवणुकीवर भर द्यावा. म्हणजेच आर्थिक स्थिती मजबूत असणाऱ्या कंपन्यांमधील गुंतवणूक टिकवून ठेवावी. एसआयपी बंद करणे योग्य नाही. ते सुरूच ठेवले पाहिजे. पोर्टफोलिओमध्ये वेगवेगळ्या प्रकारची गुंतवणूक हवी. म्हणजेच शेअर्स, बाँड्स, म्युच्युअल फंड आणि सोने या सगळ्यामध्ये काही ना काही रक्कम गुंतवण्याचे ध्येय ठेवायला हवे. सध्याचा काळ लक्षात घेता प्रत्येकाने आपत्कालीन निधी ठेवावा. समजा, एखाद्याकडे सगळे खर्च वजा जाता १०० रुपये उरत असतील तर ते सगळे गुंतवणे योग्य असले, तरी त्यातील १० रुपये कायम रोख स्वरूपात असायला हवेत. उरलेली रक्कम विमा, आरोग्य विमा, पीपीएफ, शेअर्स, बाँड्स, गोल्ड यात गुंतवणे योग्य ठरेल.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गुंतवणुकीत सातत्य राखणे गरजेचे आहे. कोणतीही स्थिती कायमस्वरूपी नसते. या न्यायाने सध्याची जागतिक तणावाची स्थितीही कायम राहणार नाही. लवकरच ती बदलेल. तेव्हा हा काळ संयम, दीर्घकालीन दृष्टिकोन आणि योग्य निर्णय घेण्याचा आहे हे ओळखायला हवे. जगात काहीही घडले तरी देशात कोणती क्षेत्रे सुरक्षित राहू शकतात, याचा अभ्यास करून गुंतवणूक केली पाहिजे. यालाच आपण ‘डिफेन्सिव्ह स्टॉक्स’ असे म्हणतो. यात उपभोग्य वस्तू, फॉर्मास्युटिकल्स, आरोग्यरक्षण, तंत्रज्ञान आणि गॅस, पॉवर तसेच संरक्षण या क्षेत्रांचा समावेश होतो. तेव्हा यातील गुंतवणूक आर्थिक हित धोक्यात आणणार नाही, याची खात्री बाळगावी. सध्या मीडकॅप, स्मॉलकॅपपेक्षा लार्जकॅपवर जास्त लक्ष ठेवले पाहिजे. यात मल्टी असेट म्युच्युअल फंडला प्राधान्य देता येईल. कारण ते बाँड, स्टॉक आणि सोने या तिन्हीतही गुंतवणूक करतात. गुंतवणूकदारांना याचा खात्रीने फायदा होऊ शकतो. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे कोणतीही गुंतवणूक एकदम करू नये. ती टप्प्याटप्प्यात करायला हवी. म्हणजेच एखाद्याने एक लाख रुपये गुंतवणुकीसाठी बाजूला काढले असतील तर ते कोणत्याही योजनेत एकदम टाकू नयेत. त्याचे तीन वा चार भाग करून त्यानुसार गुंतवत जावे. एखादा शेअर शोधल्यास एकदम सगळे पैसे न घालवता टप्प्याने गुंतवल्यास फायदा होईल, हे लक्षात घ्यायला हवे. ▮

(लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आहेत.)

## रविवारची पत्रे

### कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शिक्षक



कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) जगभरातील अनेक क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. वैयक्तिककृत अभ्यासक्रम, त्वरित मूल्यांकन आणि संवादात्मक शिक्षण अशा सुविधा एआय उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे एक प्रश्न समोर येतो ‘एआय शिक्षकांची जागा घेऊ शकतो का?’ अनेक फायदे असूनही उत्तर स्पष्ट आहे ‘नाही. एआय एक प्रभावी सहायक ठरू शकतो, परंतु शिक्षकाची जागा घेऊ शकत नाही.’ स्वामी चिन्मयानंद म्हणतात, ‘विद्यार्थी म्हणजे भरायची भांडी नव्हेत, तर पेटवायचे दिवे आहेत. शिक्षण हे केवळ माहिती देणे नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास आणि करुणेची ज्योत प्रज्वलित करणे आहे. एआय अमर्याद माहिती देऊ शकतो, परंतु प्रेरणा देऊ शकत नाही, मार्गदर्शन करू शकत नाही किंवा आत्मोन्नतीकडे नेऊ शकत नाही. खरी शिक्षण प्रक्रिया ही परिवर्तनात्मक असते.’

चिन्मय व्हिजन कार्यक्रमानुसार शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची समग्र प्रक्रिया आहे. हे शिक्षण भारतीय संस्कृती, देशभक्ती, वसुधैव कुटुंबकम् आणि मूल्याधारित जीवनशैली यावर भर देते. ही मूल्ये केवळ संगणकीय प्रणालीद्वारे शिकवता येत नाहीत. त्यासाठी शिक्षक आवश्यक असतो; जो हे मूल्य स्वतः जगतो आणि विद्यार्थ्यांपर्यंत शब्द, कृती आणि संबंधांद्वारे पोहोचवतो. एआय ही एक यंत्रणा आहे, जी कार्यक्षम आणि सातत्यपूर्ण आहे. तिच्यात संवेदनशीलता किंवा सहानुभूती नसते. एखादा विद्यार्थी चिंतेत आहे की घाबरलेला आहे, हे एआय समजू शकत नाही. शिक्षक मात्र सहज लक्षात घेतो आणि प्रेमाने, काळजीने प्रतिसाद देतो. ही भावनिक साथ विद्यार्थ्याच्या आत्मसन्मानासाठी आणि मानसिक ताकदीसाठी अत्यावश्यक आहे. शिक्षण हे केवळ अभ्यासापुरते मर्यादित नाही. संवादकौशल्य, सहकार्य, सर्जनशीलता आणि समस्यांचे समाधान या जीवनकौशल्यांचे शिक्षण आवश्यक झाले आहे. ही कौशल्ये एआय शिकवू शकत नाही. त्यासाठी लागते मानवी संवाद, प्रत्यक्ष अनुभव आणि वैयक्तिक मार्गदर्शन; जे शिक्षक सहजपणे देऊ शकतो.

शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी जिवंत आदर्श असतात. शिक्षकाची भूमिका केवळ वर्गात शिकवण्यापुरती मर्यादित नसते. विद्यार्थ्याची कौटुंबिक पृष्ठभूमी, भावनिक स्थिती आणि सामाजिक पर्यावरण समजून घेणे हे शिक्षकाचे कर्तव्य असते. शिक्षणात खेळ आणि सहशालेय उपक्रमांचे महत्त्वाचे स्थान आहे. संघभावना, शिस्त, समायोजन आणि मानसिक मजबुती या कौशल्यांचा विकास त्यातून होतो. एआय गुणांकन करू शकतो, पण संकटात साथ, पराभवानंतर प्रेरणा आणि सकारात्मक वृत्ती शिकवू शकत नाही. हे शिक्षकच प्रभावीपणे शिकवतो.

एआय हे सहायक साधन म्हणून स्वागतार्ह आहे. ते शिक्षण अधिक परिणामकारक, सुलभ आणि वैयक्तिक बनवू शकते. पण शिक्षण ही मनाची कला आहे; सांकेतिक शब्दकोड नाही. शिक्षक हे अद्वितीय मार्गदर्शक आहेत, जे विद्यार्थ्यांना ज्ञान, विवेक आणि चारित्र्याच्या वाटेवर नेतात. स्वामी चिन्मयानंदांनी म्हटल्याप्रमाणे, शिक्षणाचा हेतू केवळ उपजीविका नव्हे, तर मूल्याधारित हेतुपूर्ण जीवन घडवणे आहे. हे महान कार्य केवळ शिक्षकच करू शकतो.

**डॉ. किशोर कुलकर्णी**/९८२६२०६५२०

### लग्न संगीताचे सूर... शिस्त व वेळेतच हवे!

लग्न हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय सोहळा असतो. आनंद, उत्सव, नव्या आयुष्याच्या सुरुवातीचा क्षण यासाठी घरातील प्रत्येक जण मनापासून सज्ज असतो. हसणं, खेळणं, नाचणं, आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ‘संगीत’ हे या क्षणांना अधिक रंगतदार बनवतं. परंतु आजकाल या ‘संगीत’ नावाच्या कार्यक्रमाने जणू काही शिस्तीच्या आणि वेळेच्या चौकटीच मोडून टाकल्या आहेत. लग्न समारंभातील रात्री उशिरापर्यंत चालणारे डीजे आणि मोठ्या आवाजातील बॅण्ड वाजवण्याची पद्धत समाजात एक अघोषित परंपरा बनू लागली आहे. ही परंपरा आता प्रश्नचिन्हासारखी वाटू लागली आहे.

संगीताचा उपयोग आनंद व्यक्त करण्यासाठी आहे, हे खरे आहे. पण या आनंदाला वेळेची आणि सभ्यतेची मर्यादा असावी लागते. अनेक वेळा आपण पाहतो की, लग्नातील संगीत रात्रभर चालू असते. लोक उशिरापर्यंत नाचतात, गातात आणि मोठ्या आवाजात आवाज वाढवत जातात. यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना त्रास होतो, वृद्धांची झोपमोड होते, लहान मुलं अस्वस्थ होतात आणि रुग्ण असलेल्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या सगळ्याकडे आपण जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहोत. वेळेचे भान हरवून केलेला कोणताही आनंदाचा उत्सव हा इतरांच्या वेदनेचे कारण ठरू शकतो. जर आपल्या आनंदामुळे दुसऱ्यांना त्रास होत असेल, तर तो आनंद खरा समाधान देतो का? काही वेळा रात्री ११-१२ वाजता किंवा त्याही नंतर डीजे वाजवले जातात. अशा वेळी पोलिस यंत्रणेला हस्तक्षेप करावा लागतो.

प्रश्न असा आहे की, लग्नात आनंद साजरा करताना आपण समाजासाठी असलेल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? आनंद साजरा करताना जर शिस्त आणि वेळेची जाणीव ठेवली, तर त्या आनंदाला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होतो. लग्नाच्या संगीताचा हेतू आहे आपले मनोगत आणि उत्साह इतरांशी शेअर करणे, पण यासाठी इतरांची झोप, शांतता आणि आरोग्य धोक्यात घालणं हे योग्य नाही. आधुनिक तंत्रज्ञानाने संगीताची साधनं जरी वाढवली असली, तरी त्याचा वापर विवेकाने आणि मर्यादित करणे आवश्यक आहे.

शेवटी, समाज म्हणजे एकत्र नांदणाऱ्या व्यक्तींचं चित्र असतं. आपली प्रत्येक कृती इतरांवर परिणाम करते. आपण समाजाचाच एक भाग आहोत हे लक्षात घेऊनच आपले कार्यक्रम पार पाडले पाहिजेत. कायद्याने रात्री १० नंतर ध्वनिप्रदूषणाची मर्यादा घालून दिली आहे, ती काही चुकीच्या हेतूने नाही. तिचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे.

आपण आपले संगीत प्रेम, नृत्य आणि आनंद या सर्व गोष्टींना योग्य वेळ आणि योग्य मर्यादेत साजरे केले, तर समाजात सौहार्द आणि सहिष्णुतेची भावना अधिक दृढ होते. आज गरज आहे ती केवळ आनंद साजरा करण्याची नाही, तर तो आनंद इतरांसोबत शेअर करतानाही सभ्यतेचा विचार करण्याची. कारण संगीताचा आवाज जरी क्षणिक असतो, पण त्याचा प्रभाव अनेकांच्या मनावर कायम राहू शकतो. आता विचार करा तुमचं संगीत इतरांच्या वेदनेचं कारण तर बनत नाही ना?

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### आपणचि केली आपली फसगत

उद्या रविवार म्हणजे आमचा सुटीचा दिवस म्हणून निवांत झोपलो होतो. सकाळी उठण्याची लगबग नाही म्हणून आनंदात होतो. परंतु म्हणतात ना, सुख भोगणे हेही दैवात असावं लागतं.

सौ.ने मला झोपेतून गदागदा उठविले. मी दचकून उठलो. डोळे चोळत थोडं अंथरुणात बसलो तर पुन्हा वीज कडाडली. “अहो, उठा, किती वेळ असं बसू राहणार? चहा झालाय् किती वेळचा, बाहेर जा अन् ते डोक्यावरचं ओझं थोडं कमी करून कलप लावून, ते सगळे पांढरे झालेले ब्रशसारखे केस नीट करून या. उद्याच माझ्या बहिणीकडे जायचं आहे, तेव्हा हे असं ध्यान बरं दिसतं का?” “हो, हो किती ही विनाकारणची टकळी बस कर आता” अन् तो समोर आलेला चहा घशाखाली उतरविला (बेड टीची फॅशन म्हणून तोंड धुण्याआधीच चहा घ्यायचा असतो) तिच्या म्हणण्याप्रमाणे आता बाहेर जायचं, तिच्या म्हणण्याप्रमाणेच सर्व काही करायचे हे नेहमीचेच. थोडं विचारांची दिशा बदलली अन् ते विचार मनात घोंघावू लागले.

वाटलं हिच्या बहिणीकडे जायचं म्हणून, केस काळे करायचे, व्यवस्थित दिसायचं म्हणजे मी खरंच अव्यवस्थित दिसतो का? अन् हिलाच की इतरांनाही? नाही, नाही ही सर्व त्या दिसण्यासाठीही धडपड अन् हे पांढरे झालेले केस तिने पाहिले नसावे का? आणि खरंच आम्ही जन्माला आलो तेव्हा, डोक्यावर केस नव्हतेच मुळी, तोंडात दात नव्हते, डोळ्यात तेज नव्हतं अन् हातापायात तर ताकद नव्हतीच. आईनं तर चालायला शिकविलं. दाईबाईनं शरीर सुदृढ बनविलं अन् आता खरंच ज्याने हे सर्व दिले, त्याने ते परत घेऊच नये हा कोणता हट्ट? अन् घेतलं तर वावगं ते काय? औषध नाही का काही काळानंतर अकार्यक्षम होतं (एक्सपायरी) तसं आमचं नसेल कशावरून?

पायातली शक्ती कमजोर होणं, गुडघे दुखणं, डोळ्यांनी कमी दिसणं, केस पांढरे होणे (अजून टक्कल नाही, हे त्याचेच उपकार) भरीसभर तोंडातील दातांनीही आपली जागा सोडणं, मला वाटते ते आताशा, आपसात भांडायला लागलेत. असो. मग त्याने “आता तुला चलायचं” ही अशी आगाऊ सूचना तर दिली नसावी? मग तो आधी सूचना देतोय् हे गैर कसलं? पण नाही, त्याच्याही सूचनेकडे दुर्लक्ष करायचं, केस काळे करून, तोंडात नकली दाताची कवळी बसवून, डोळ्यांना चष्मा लावून आणि आता तर म्हणे अधिक तरुण दिसण्यासाठी ब्युटी पार्लर नावाचं नवीनच फॅड आलंय् बाजारात परत.

एवढे केल्यावर त्या सृष्टीच्या निर्माणकर्त्याला आम्ही फसवतोय् असं नाही का वाटत? अन् एवढा तो न समजण्याइतका भोळा असेल का? निश्चितच नाही. मग काही अकस्मात घडलं की त्याच्याच नावानं ओरडायचं, अहो हा कसा गेला? इतक्या लवकर, चांगला तरुण तर होता. (खरंच तो तरुण नव्हता, दिसत होता) ज्यानं तुम्हाला भरभरून दिलं, तो ते परत घेणारच, एवढं साधं गणित आपणाला समजू नये? विचारांची शृंखला संपतच नव्हती अन् लगेच पत्नीनं चिडून, माझ्या अंगावरची शाल ओढून मला जवळजवळ बाहेर काढलंच. तिच्या म्हणण्यासारखं जवान होऊन परत यायला उठलो. म्हटलं, चला आता वेळ करू नये. केस बारीक करून, काळे करून परत घरी आलो. आता सर्वांना मी तरुण दिसणार म्हणून तो खोटा आनंद उपभोगतानाच गुणगुणत होतो,

झाले जीर्ण मनी मनोरथ पहा, मी वंचलो यौवना
होते जे गुण सर्वही, विफलते झाले गुणज्ञा विना
युक्त युक्त विचार काल न करी निशंक सर्वात्मना
आता हे सुचते दुजी गती नसे गौरीव पायाविणा

**लक्ष्मण कुऱ्हेकर**/९५४५११२६४६

### गावाकडची माणसं

शहरापासून दूर निसर्गानी वेढलेला परिसर येथे वसलेली लहान लहान गावं यास आपण ग्रामीण भाग म्हणतो. या ग्रामीण भागात वास्तव्यास असलेले लोक निसर्ग सान्निध्याच्या अनुकूल प्रभावामुळे स्वभावाने साधी सरळ असतात. राहणीमानात कुठेही



भपकेपणा नसतो. वागणे, बोलणे व व्यवहारात नैसर्गिकता असते, कारण निसर्गात हे ग्रामीण लोक बालपणापासून रमलेले असल्याने त्यांचे निसर्गाशी जिव्हाळ्याचे नाते जुळले असते तसेच काळ्या मातीशी नाळ जुळलेली ही माणसे जीवजंतू, पक्षी, पाखरे, प्राणी यांच्यावर जीव लावणारी असतात. कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच घरात पाळले गेलेले पाळीव पशू-पक्षी, प्राणी, गुरेढोरे यांचे संरक्षण आपुलकीने व जबाबदारीने करतात. मायेने जपणूक करताना अस्सल गावशैलीत संवाद साधतात. त्यामुळे या मुक्या जनावरांशी त्यांची गट्टी जमलेली असते. संपूर्ण गावाशी सलोख्याचे संबंध जोपासत ही माणसं एकमेकांच्या सुख-दुःखात हिरिरीने भाग घेतात.

गावातील धार्मिक उत्सव असू दे की कौटुंबिक सोहळा एकमेकांना पुरेपूर सहयोग करून कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद मिळूनमिसळून लुटतात. एकलकोंडेपणा या शब्दाचा अर्थ कदाचित या गावकऱ्यांना माहितीही नसेल. एखाद्या कुटुंबात दुःखाची सावली पडली की कोरडे सांत्वन नव्हे तर आपुलकीच्या ऊबदार छताखाली आसरा देऊन आधाराचे पांघरूण घालतात. गावखेड्यातील लोकांची जीवनशैली नित्यनियमाने ठरलेली असते. पहाटे तांबडे फुटायच्या आधीच दिनचर्येला सुरुवात करून आपल्या उपजीविकेच्या तयारीला लागतात. उगवता सूर्य या गावकऱ्यांना रोज नव्याने ऊर्जा देत असतो आणि मावळता सूर्य दिवसभराच्या श्रमाने थकलेल्या शरीराला निपचित करून शांत झोप देत असते. प्रामुख्याने शेतीव्यवसाय व इतर लहानसहान कार्य करून सुखासमाधानाने संपूर्ण आयुष्य घालवणारी ही गावाकडची माणसं मोठे स्वप्न बघण्याचे साधे धाडसही करीत नाही. मनोरंजन क्षेत्र काय व कसे असते हे न जाणणारे लोक निवांत क्षणी चावडीत बसून गप्पा मारताना एकमेकांचे सुख-दुःख वाटून घेतात. बरेचदा यांचा चर्चेचा विषय असतो पीक-पाणी, निसर्ग विपदा यामुळे उत्पादनावर झालेली हानी, डोक्यावरील कर्जाचा बोझा, कुटुंबातील लहानमोठ्या समस्या याहून विषय पुढे गेलाच तर गावातील सुखसुविधांची गैरसोय जसे अशुद्ध पाणी, आरोग्य केंद्रातील गैरसोय, वीज पुरवठा खंडित होणे वगैरे. देशाच्या राजकारणाविषयी चर्चा या गावकऱ्यांमध्ये फारशी नसतेच. निवडणुकीच्या दिवसात झाली बस तेवढीच.

पारंपरिक संस्कृती जपणारी ही माणसं धर्म संस्कृती पाळणारी असतात. त्यामुळे पारंपरिक सणांना धरून असतात.

गावकऱ्यांना गावाच्या वेशीवरूनच
दिसतो निसर्ग सारा
पक्षी पाखरं प्राणी रानावनात घालतात येरझारा
निसर्गाचे ऋणी ही गावकरी
सृष्टी-सन्निध्यात
मिळतो स्वच्छ निरोगी वारा

**शीला श्रीकांत पवनीकर**/७२७६६१२५१६

### अहल्यादेवी होळकरांचे सुशासन आणि सामाजिक समरसता

अहल्यादेवी होळकर हे नाव उच्चारताच आपल्या डोळ्यासमोर जी प्रतिमा तयार होते ती म्हणजे श्वेतवस्त्र धारण केलेली, डोक्यावर पदर घेतलेली, करारी चेहरा असलेली आणि हातात शिवलिंग घेऊन उभी असलेली एक सात्त्विक मूर्ती.. ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, गोरगरिबांविषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे निर्मूलन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बीमोड, प्रजेविषयी तळमळ असे कितीतरी समाजसुधारक कार्य करणाऱ्या लोकमाता अहल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला. माणकोजी शिंदे हे दूरदर्शी स्वभावाचे असल्याने अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली.

अवघ्या आठ वर्षांची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला. लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले.

इ. स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहल्यादेवींचे शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहल्यादेवींनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून त्यांनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे समजून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

माळव्याच्या होळकर घराण्याची पुत्रवधू, कुशल सुशासक अहल्यादेवी होळकर यांचे हे त्रिशताब्दी जयंती वर्ष आहे. नुकतेच राज्यातील महायुती सरकारने १३ मार्च २०२४ रोजी अहमदनगरचे नाव अहल्यादेवी नगर करण्याचा निर्णय घेतला. अहल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्ताने अहल्यादेवी होळकर यांचे सामाजिक कार्य व त्यांचे कर्तृत्व समाजमानसात रुजवण्याची व सद्यःपरिस्थितीत त्यांच्या उपकारांची दखल घेण्याची नितांत गरज आहे.

मुघलांनी भारत मातेवर केलेल्या क्रूर आक्रमणानंतरही आज भारतात जी हिंदू संस्कृती आणि मंदिरे टिकून आहेत यामध्ये अहल्यादेवींचा खूप मोलाचा वाटा आहे, हेच त्यांच्या जीवनचरित्रातून दिसून येते. अशा थोर, परोपकारी, धर्मनिष्ठ आणि खऱ्या अर्थाने समाजसेवी सुशासक पुण्यश्लोक अहल्यादेवींना मानाचा मुजरा. ▮

**वीणा रवींद्र आचार्य**/९४२३१७५७१५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



# एरंड पिकाची करा लागवड

**एरंडी हे व्यापारी पीक आहे. एरंडेलला बाजारात खूप मागणी आहे. त्यामुळेच आजकाल विविध उत्पादनांसाठी देश-विदेशात त्याची उपयुक्तता वाढली आहे. या पिकाची लागवड कमी संसाधनांमध्ये करता येते. तसेच त्याला विशेष माती किंवा हवामानाची आवश्यकता नसते. यामुळेच आजकाल त्याच्या लागवडीला जास्त प्राधान्य दिले जात आहे.**



देशातील शेतकऱ्यांमध्ये औषधी वनस्पतींची लागवड करण्याची प्रथा वाढली असून, सुगंध अभियानांतर्गत सरकारही या वनस्पतींच्या लागवडीसाठी सातत्याने प्रोत्साहन देत आहे. एरंडी हे देखील असेच एक पीक आहे ज्याला सरकार सतत प्रोत्साहन देत आहे, त्याची लागवड करून शेतकरी खूप चांगला नफा मिळवू शकतात.

**एरंडाची लागवड कुठे करावी-** हे कोणत्याही प्रकारच्या माती किंवा हवामानात घेतले जाऊ शकते. शेतकरी ज्या शेतात पीक घेतो त्या शेतात पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था चांगली असते हे लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. सामान्य तसेच आदर्श तापमानाचा या झाडाच्या वाढीवर परिणाम होत नाही. आम्ही तुम्हाला हे देखील सांगूया की इतर पिकांच्या तुलनेत त्याची लागवड खूपच स्वस्त आहे. एक हेक्टरमध्ये लागवड करण्यासाठी केवळ २५ ते ३० लाखांचा खर्च येतो.

**एरंड खूप उपयुक्त -** एरंड हे बहुउपयोगी व्यावसायिक पीक आहे. याच्या बिया तेल तयार करण्यासाठी वापरतात. हे तेल एक प्रकारचे औषधी तेल आहे जे विविध प्रकारचे शारीरिक विकार बरे करण्यासाठी वापरले जाते. हे तेल बाळाच्या मसाजसाठी देखील खूप फायदेशीर आहे. त्यामुळे त्यांची हाडे मजबूत होतात. याशिवाय कापड रंग आणि साबण बनवण्यासाठीही ते वापरतात.

**एरंडेल तेल साठवणे सोपे -** एरंडाच्या लागवडीकडे कल वाढण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्याचे तेल साठवणे खूप सोपे आहे. शून्य तापमानातही ते गोठत नाही आणि त्यामुळेच शेतकऱ्यांना या तेलाचा चांगला भाव आणि चांगला नफाही मिळू शकतो.

**एरंडीची लागवड कशी करावी-** एरंडाची लागवड दोन प्रकारे करता येते. सर्वप्रथम रोपवाटिकेत रोपे तयार केल्यानंतर शेतकऱ्यांनी त्यांची शेतात लागवड करावी. याशिवाय सीड ड्रिलद्वारेही बियाणे शेतात लावता येते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, शेतासाठी हेक्टरी २० किलो बियाणे लागते. शेतकऱ्यांनी लावणीपूर्वी दोन-तीन वेळा नांगरणी केली तर पीक चांगले येते. तणांपासून शेतांचे संरक्षण करा. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे पीक लावणीनंतर १२० ते १३० दिवसांत कापणीसाठी तयार होते.

**उत्पन्न-** शेतकऱ्याने एक हेक्टरमध्ये २५ ते ३० क्विंटल एरंडीचे उत्पादन घेतल्यास त्याला दीड ते दोन लाखांचा नफा सहज मिळू शकतो.



# तुर पिकावरील कीड व एकात्मिक नियंत्रण



**तुर हे डाळवर्गीय पिकांपैकी एक प्रमुख पीक आहे. पण बऱ्याच वेळा उत्पादन कमी होताना दिसते. अनेक कारणांमुळे या डाळीचे उत्पादन कमी होत असते. त्यातील एक कारण म्हणजे किड. तूर पीकावर प्रामुख्याने शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंगमाशी, पाने व फुले जाळी करणारी अळी, शेंगावरील ढेकूण, फुलकिडी, खोडमाशी, पट्टेरी भुंगेरे अशा विविध किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो. कधी कधी साथीच्या स्वरूपात कीड आढळून आल्यास ७० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान होऊ शकते. म्हणून या किडींची ओळख करून त्याचे वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.**

**१) शेंगा पोखरणारी अळी :-** तुर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या अळीचा रंग हिरवट पिवळसर असून अंगावर तुरळक समांतर रेषा असतात. एक मादी सरासरी ८०० अंडी घालते. मादी कोवळी पाने, काळ्या, फुले तसेच शेंगावर अंडी घालते. अंड्यातून बाहेर पडलेली अळी कोवळी पाने, कळ्या व शेंगांना छिद्र पाडून आतील दाणे खाते, तसेच एक अळी सुमारे ३० ते ४० शेंगांना नुकसान करून आपली आवस्था पूर्ण करते. या अळीचा जीवनक्रम ४ ते ५ आठवड्यात पूर्ण होतो.

**२) शेंगमाशी: -** शेंगमाशीचा रंग हिरवट असून आकाराने फारच लहान असते. ही अळी पांढऱ्या रंगाची असून ती गुळगुळीत असते व तिला पाय नसतात. सुरुवातीस या माशीच्या प्रादुर्भावाची कोणतीही लक्षणे दिसून येत नाही. परंतु वाढ झालेली अळी कोषावस्थेत जाण्यापूर्वी शेंगेला छिद्र पाडून माशी बाहेर पडल्यावरच नुकसानीचा प्रकार लक्षात येतो. अळी शेंगेत प्रवेश करून अर्धवट दाणे खाते त्यामुळे ते बियाणे म्हणून वापरण्यास उपयुक्त नसते.

**३) पिसारी पतंग :-** या पतंगाची अळी १२.५ मि.मी. लांब हिरवट तपकिरी रंगाची असते. तिच्या अंगावर सूक्ष्म काटे व केस असतात. अळी शेंगावरील साल खरवडून छिद्र करते व बाहेर राहून दाणे पोखरते.

**४) पाने व फुले जाळी करणारी अळी :-** ही अळी हिरवट पांढरट रंगाची असून दोन्ही बाजूंना काळे ठिपके असतात. या किडीचा प्राद्रुर्भाव पीक फुलोऱ्यात आणि जास्त आर्द्रता असतांना आढळून येतो. अळी पाने, फुले व कळी यांचा एकत्रित गुच्छ तयार करून त्यात लपून बसते. पीक फुलोऱ्यात आल्यानंतर अळी शेंगेमधील दाणे फस्त करते.

**५) शेंगावरील ढेकूण :-** पिल्ले व प्रौढ पाने, शेंगातील रस शोषण करतात. पूर्ण वाढलेला ढेकुण हा तपकिरी रंगाचा असतो. अंडी ८ दिवसाची असताना त्यातून लाल रंगाची पिल्ले बाहेर पडतात. या किडीचा प्रादुर्भाव शेंगावर असला तरी पिल्ले फुले व पाने यामधील रस शोषण करतात. त्यामुळे शेंगावर पिवळसर ठिपके पडून नंतर शेंग आकसून जाते.

**६) पाने गुंडाळणारी अळी:-** या किडीचा पतंग लहान व तपकिरी रंगाचा असतो. एक मादी पानावर व देठावर ८० ते १०० अंडी घालते. प्रामुख्याने या किडीचा प्रादुर्भाव पेरणी उशिरा केल्यास तसेच ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यामध्ये जास्त आर्द्रता व मध्यम तापमान असल्यास आढळून येतो.

**७) तुडतुडे : -** या किडीचे पिल्ले व प्रौढ पानातून रस शोषण करतात. त्यावेळी विषारी लाळ पानाच्या पेशीत सोडतात. त्यामुळे पाने पिवळी पडून सुकतात आणि गळून पडतात.

**८) खोडमाशी :-** या किडीची माशी खोडामध्ये अंडी घालते तसेच अंडी व कोषावस्थेत १ ते २ आठवड्याची असते. अंड्यामधून बाहेर पडलेली अळी कोवळ्या भागावर उपजीविका करते आणि नंतर कोवळे खोड पोखरून आत शिरते. यामुळे रोपाचा शेंडा वाळतो.

**९) पिठ्या ढेकुण : -** ही कीड रंगाने पांढरट व आकाराने लांब वर्तुळाकार असते. पिल्ले व प्रौढ तुरीची पाने व कोवळे शेंडे यामधील रस शोषण करतात आणि त्यामुळे ते वाळतात.

**१०) पट्टेरी भुंगेरे :-** प्रौढ भुंगेरे अधिशपनाने फुलकळी व फुले खातात. एका दिवसात एक भुंगा २० ते ३० फुलांना हानी पोहचवतो. या किडीच्या नियंत्रणसाठी उन्हाळ्यामध्ये खोल नांगरट करावी. पिकावर प्रादुर्भाव दिसल्यास त्यांना पकडून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकावे त्यामुळे ते नष्ट होतील.

**एकात्मिक कीड व्यवस्थापन :-**

पीक काढणी नंतर शेतात खोलगट नांगरट करावी. कमी प्रमाणात बळी पडणाऱ्या वाणांची निवड करावी. वेळेवर अंतरमशागत करून कीड ज्या तणावर उपजीविका करतात अशा तणांचा नाश करून पीक तणविरहित करावे.

तूर पिकांमध्ये हेक्टरी ५० ते ६० पक्षी थांबे करावेत. यामुळे पक्षी अळ्यांचे भक्षण करतील. एकरी पिकांमध्ये तीन ते चार कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) लावावे. शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठी हेलीओकील हे प्रभावी विषाणूग्रस्त जैविक किटकनाशक पीक फुलोऱ्यात किंवा शेंगा लागताना फवारावे. शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी कडूनिंबाच्या ५ % अर्काची पहिली फवारणी पिक ५० % फुलोऱ्यात असताना व दुसरी फवारणी करावी.

**कीड उपाययोजना व फवारणीची वेळ कीटकनाशके प्रमाण / १० ली. पाणी-**

शेंग पोखरणाऱ्या किडी (शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंग माशी) आणि पाने व फुले जाळी करणारी अळी. पिकास फुले, कळ्या लागताच. ५ % निंबोळी अर्क + १ % साबण चुरा एकत्र फवारावे. पीक ५० % फुलोर्यात असताना. क्विनॉलफॉस २५ ई. सी. १६ मि. लि. दुसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांनी. इमामेक्टीन बेण्झोएट ५ एस.जी. किंवा फ्लुबेंडामाईड ३९.३५ एस.सी. ५ ग्रॅम किंवा क्लोरॅन्ट्रीनीलीपोल १८.५ एस.सी. ३ ते ४ मि.लि. किंवा स्पीनोसॅड ४५ एस.सी. ४ ग्रॅम फवारावे. शेंग माशी मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यास डायमेथोएट ३० ई.सी. १० मि.लि. पिठ्या ढेकुण, मावा, तुडतुडे, फुलकिडे प्रादुर्भाव दिसल्यास डायमेथोएट ३० ई.सी. १० मि.लि. प्रमाणात फवारावे.

# बदक पालन व्यवसायासाठी मिळते कर्ज



**योजना**

**खरं तर, बदकपालनातील जोखीम कुक्कुटपालनाच्या तुलनेत खूपच कमी आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बदकांची अंडी आणि मांस दोन्हीमध्ये प्रथिनांचे प्रमाण खूप जास्त आहे. बाजारपेठेत त्याची मागणी सतत वाढत आहे. बेरोजगार लोकांसाठी हे उत्पन्नाचे एक चांगले साधन बनले आहे. काही लोक मोठ्या प्रमाणात बदकांचे संगोपन करून व्यवसाय म्हणूनही करत आहेत. बदक पालन कसे करावे? याबाबत माहिती देण्याबरोबरच बदक पालनासाठी कर्ज योजनेची माहिती जाणून घेऊ...**

**बदक पालनातून उत्पन्न-**

बदक एक वर्षात २८५ ते ३०० अंडी देते आणि बाजारात एका अंड्याची किंमत सुमारे ६ ते ८ रुपये आहे. वास्तविक बदकाची अंडी आणि मांस दोन्ही प्रोटीनने भरलेले असतात, त्यामुळे त्याची मागणी सातत्याने वाढत आहे. यातून मिळणाऱ्या नफ्याबद्दल बोलायचे झाले तर, १००० कोंबड्यांच्या संगोपनावर वर्षभरात सुमारे एक लाख रुपये खर्च येतो तर हजार बदकांपासून पशुपालकांना वर्षभरात सुमारे ३-४ लाख रुपये उत्पन्न मिळते. बदक पोल्ट्री फार्म उघडण्यासाठी, सरकार नाबार्ड (राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक) मार्फत कर्ज तसेच व्यवसायासाठी सबसिडी देते. याशिवाय विविध बँकांकडून कर्जही दिले जाते. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

सामान्य आणि ओबीसी प्रवर्गातील लोकांनी घेतलेल्या कर्जावर २५ टक्क्यांपर्यंत सबसिडी आहे. अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील व्यक्तींसाठी अनुदानाची रक्कम ३५ इतकी निश्चित करण्यात आली आहे. बदक पोल्ट्री फार्म सुरू करण्यासाठी सरकारकडून २५ टक्के अनुदानही दिले जाते. दुसरीकडे, एससी आणि एसटी प्रवर्गातील व्यक्तींसाठी अनुदानाची रक्कम ३५ टक्के निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय शेतकऱ्यांवर कोणताही दबाव येऊ नये म्हणून कर्जही दिले जाते. नाबार्ड (राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक) सुद्धा बदक पालनासाठी शेतकऱ्यांना कर्ज देते. याशिवाय, प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत एसबीआय बदक पालनासाठी कर्जही दिले जाते.

**शेतकरी आपल्या शेतीमध्ये नवनवीन पिके घेऊन चांगले उत्पादन मिळवत असतात. आज आपण अशाच एका शेतीविषयी जाणून घेणार आहोत, ज्यामधून शेतकऱ्यांची चांगली कमाई होईल. सर्वात महत्वाचे म्हणजे तुती लागवड आणि उत्पादन यामध्ये तुतीची रोपवाटिका ही सर्वात महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. महाराष्ट्रात एकूण १४,९०५ एकर तुती लागवड झाली आहे. तुतीचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. अशा स्थितीमध्ये येत्या काळात तुती रोपांची मागणी वाढत राहणार आहे. त्यामुळे सर्वात पहिल्यांदा रोपवाटिकेचे योग्य नियोजन शेतकऱ्यांनी केले पाहिजे. याविषयी माहिती जाणून घेऊ...**

# तुती रोपवाटीका



**तुती रोपवाटिका कालावधी :-** ज्या शेतकऱ्यांना जून ते सप्टेंबर या दरम्यान तुतीची लागवड करायची आहे, अशा शेतकऱ्यांनी १५ फेब्रुवारीपर्यंत रोपवाटिकेचे नियोजन करा. तर ज्यांना डिसेंबर ते जानेवारीमध्ये लागवड करायची आहे, त्या शेतकऱ्यांनी सप्टेंबर महिन्यात रोपवाटिकेचे नियोजन करणे फायद्याचे ठरेल.

**रोपवाटिकेसाठी गादी वाफे करणे :-** सपाट व पाण्याचा निचरा होणार्या जमिनीची निवड करा. दोन ते तीन वेळा जमिनीची नांगरट करून शेतातील ढेकळे फोडून काडी कचरा स्वच्छ करून बेड करा. गादी वाफे करताना दोन भाग मातीमध्ये मुरलेले शेणखत मिसळा. गादी वाफे ८२ फूट लांब व ४ फूट रुंद आकाराचे ४ बेड करा. ३ ते ४ महिने वयाची रोपे आवश्यक असल्यास दोन रोपात १० सेंमी व दोन ओळींत २० सेंमी अंतर ठेवा. प्रत्येक बेड भोवती १.५ फूट रुंद पाण्यासाठी सरी करून घ्या. एक एकर तुती लागवड पट्टा पद्धतीने ५ × ३ × २ फूट अंतरावर करण्यासाठी ५,५५५ रोपे लागतात.

**बेणे निवड व लागवड :-** बागायतीसाठी 'व्ही-१' व कोरडवाहूसाठी 'एस-१३' या तुती वाणाचे बेणे निवडावे. बेणे निवडीसाठी तुतीचे वय ७ ते ८ महिने आणि बेण्याची जाडी पेन्सिल आकाराची असावी. शेंड्याकडील कोवळ्या हिरव्या कांड्या बेण्यासाठी वापरू नये. ३ ते ४ डोळे असलेले करड्या रंगाचे बेणे निवडा.

**तुती रोप काढणी व लागवड :-**

१) बेणे लावल्यापासून ३ महिन्यांत रोपांची वाढ ३ फूट होते.

२) तयार झालेली रोपे लागवडीसाठी बेडवरून काढण्याआधी १ ते २ दिवस बेडला पाणी द्या. त्यामुळे रोपे काढताना रोपाच्या मुळास इजा होत नाही.

३) रोपांची वाहतूक सकाळी किंवा सायंकाळी करा.

४) जमीन नांगरणी करून शेणखत टाकून पट्टा पद्धतीने ५ × ३ × २ फूट किंवा ६ × ३ × २ फूट अंतरावर लागवड करा.

५) बेणे लागवड करण्यापेक्षा रोपे लावावीत.



# जनावरांचे रोग आणि त्यावरील उपचार

**जागतिक बाजार पेठेतील स्पर्धेत आपणास टिकावयाचे आसल्यास आपल्या दुग्धजन्य उत्पादनाची गुणवत्ता वाढवावी लागेल. त्यासाठी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जनावरांचे आरोग्य होय. गाईचे किंवा म्हैशींचे आरोग्य निरोगी असल्यावरतीच त्यांच्यापासून आपणास उच्च प्रतीचे दुग्ध उत्पादन मिळणार आहे. त्यामुळे जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे. जनावरांतील काही महत्त्वाचे रोग व त्यावरील उपचार याविषयी जाणून घेऊ...**

भारतातील पशुपालन व्यवसायात पुष्कळ अडचणींना सामोरे जावे लागते त्यातील महत्वाच्या अडचणी, दुध उत्पादन व दुध गुणवत्ता या आहेत. भारत हा पशुपालन व्यवसायात अत्यंत जलद गतीने विकास करणारा देश आहे. पशु उत्पादनात आपला देश थोड्या कालावधीतच स्वयंपूर्ण होईल. जगामध्ये भारताचा दुध उत्पादनात प्रथम, अंडी उत्पादनात सातवा तर मांस निर्यातीत सातवा क्रमांक लागतो. भारतातील पशुपालन व्यवसायात पुष्कळ अडचणींना सामोरे जावे लागते त्यातील महत्वाच्या अडचणी, दुध उत्पादन व दुध गुणवत्ता या आहेत.

**अ) संसर्गजन्य रोग :-**

हे रोग मुख्यतः विषाणू आणि जिवाणूंमुळे होतात. निरोगी जनावरांच्या शरीरात श्वसन, चारा, पाणी, सड, आजारी जनावरांशी संपर्क आणि माणसांद्वारे रोगकारक जंतू प्रवेश करतात. जनावरांतील संसर्गजन्य रोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून नियमित लसीकरण करून घ्यावे. यामध्ये अँथ्रेक्स, काळा पाय, लाळ्या खुरकत रोग, बुळकांडी रोग, स्तनदाह, पाय कुज यांचा समावेश होतो.



**भारत हा पशुपालन व्यवसायात अंत्यत जलद गतीने विकास करणारा देश आहे. पशु उत्पादनात आपला देश थोड्या कालावधीतच स्वयंपूर्ण होईल. मात्र या व्यवसायातील सर्वात मोठी अडचणी ही जनावरांच्या आजाराची आहे. जनावरांचे रोगामुळे मोठी हानी होते. तसेच दुध व्यवसायातही नुकसान होते. हे टाळण्यासाठी जनावरांचे रोग व उपचार जाणून घेणे गरजेचे आहे.**

**१) अँथ्रेक्स:-**

गाईमध्ये सर्वात जास्त प्रमाणात आढळणारा रोग असुन घातकही आहे. या रोगामुळे जनावर जास्त दिवस जिवंत राहत नाही. हा रोग मोठे बिजाणु तयार करणार्या आयताकृती जिवाणुंपासुन होतो. त्याचे शास्त्रीय नाव बॅसिलस अँथ्रेक्स असे आहे. रवंथ करणाऱ्या प्राण्यामध्ये हा रोग जास्त प्रमाणात आढळुन येतो. बॅसिलस जिवाणु अतिउच्च प्रतिचे घातक घटक निर्माण करतात. त्यामुळे जनावरांमध्ये मृत्युचे प्रमाण जास्त आढळुन येते. या जिवाणुला बिज तयार करण्यासाठी ऑक्सिजनची आवश्यकता असते.

जनावरांमध्ये रोगाची लक्षणे जिवाणूंची बिजांनी शरीरात प्रवेश केल्यानंतर ३ ते ७ दिवसानंतर दिसुन येतात. जनावरांमध्ये लक्षणे दिसु लागल्यानंतर जनावर दोन दिवसात मृत पावते. पायांना खुरे असणारी उदा. हरिण, गाय, शेळी व मेंढी या जनावरांमध्ये हा रोग प्रामुख्याने आढळतो. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने ज्यावेळी जनावर चरण्यासाठी मोकळ्या कुरणात सोडलेली असतात त्यावेळी हे जिवाणु श्वासोच्छवासाद्वारे शरीरात प्रवेश करतात. या जिवाणुंना कोणताही वास, चव, रंग नसतो. तसेच ते डोळ्यांना सहजरित्या दिसतही नाहीत. या जिवाणुंचा प्रवेश जनावराप्रमाणे माणसातही होत असतो. भूपृष्ठावरती मोठा प्रमाणात अँथ्रेक्सचे जिवाणू हवेत रोग लागण झालेल्या जनावरांमार्फत सोडण्यात येतात.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोमवार, १९ मे २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## मुरुम येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ मे -**

मुरूम शहरातील किसान चौक रेवापुरी चॅरिबेटल ट्रस्ट, मराठा सेवा संघ यांच्या वतीने दहावी-बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला

यावेळी अध्यक्षस्थानी रेवापुरी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुरुम पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक डी.डी. गव्हाणे, गुरुकुल प्रायमरी स्कूलच्या संचालिका मयुरी चौधरी, ट्रस्टचे उपाध्यक्ष तानाजी फुगटे, माजी सैनिक व्यंकट चौधरी, युवा सेना जिल्हा उपाध्यक्ष भगत माळी, नहीरपाशा मासूलदार तसेच नागालँड येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले लक्ष्मण शिंदे यांची उपस्थिती होती.



याप्रसंगी ९७.२०% गुण मिळवल्याबद्दल गायत्री इंगळे हिचे विशेष सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन,प्रास्ताविक मोहन जाधव यांनी तर आभार शहराध्यक्ष इंगळे यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त...

### मित्रचे उपाध्यक्ष आ.राणादादांचा सत्कार

**नळदुर्ग, दि.१८ मे -**

महाराष्ट्र इंस्टीट्यूट फॉर ट्रान्सफॉरमेशन-मित्र या संस्थेच्या नियामक मंडळातील उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे यांनी सत्कार केला.दि. १६ मे रोजी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथे नागरीकांच्या अडचणी सोडविण्यासाठी जनता दरबार भरविला होता. जनता दरबार पार पडल्यानंतर आमदार राणा जगजितसिंह पाटील हे नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी उदय जगदाळे यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड.अनिल काळे, सतीश दंडनाईक, ॲड.दीपक आलुरे, नेताजी पाटील, विजय शिंगाडे, सुशांत भुमकर, भाजपचे नळदुर्ग शहर अध्यक्ष बसवराज धरणे, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर, पद्माकर घोडके, धीमाजी घुगे अभिजित लाटे, संदीप गायकवाड, शरद देशमुख, अक्षय भोई, दयानंद मुडके, महादेव पाटील यांच्यासह नळदुर्ग व परीसरातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### श्रावणी मेनकुदळे हीचे शालांत परीक्षेत यश

**इटकळ, दि.१८ मे -**



मधुकरराव चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट अणदूर संचलित सिध्देश्वर विद्यालय किलज (ता.तुळजापूर) शाळेचा शालान्त परिक्षेचा निकाल ९४ टक्के लागला असून कुमारी श्रावणी रमेश मेनकुदळे हिने ८० टक्के गुण मिळवीत विद्यालयातून प्रथम आली आहे. सलोनी बाळू राठोड ७९ टक्के, अम्रुता मधूकर राठोड ७८टक्के गुण मिळवून विद्यालयातून द्वितीय त्रुतीय क्रमांक पटकावला आहे. संस्थेचे अध्यक्ष सुनील चव्हाण,मुख्याध्यापक निळोबा काळे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. कुमारी श्रावणी मेनकुदळे विद्यालयातून प्रथम आल्याने गाव परिसरातून कौतुक करीत अभिनंदन केले जात आहे.

### पुजाऱ्यास ३ वर्ष मंदिर प्रवेशबंदी

**तुळजापूर, दि.१८ मे -**

श्रीतुळजाभवानी मंदिर संस्थान येथे मद्यपान करून गोंधळ घालत तोडफोड करणाऱ्या अनुप कदम यांच्यावर मंदिर संस्थान ने कडक कारवाई करत ३ वर्षांची मंदिर प्रवेशबंदी केली आहे. मंदिर संस्थान ने गैरवर्तनामुळे नोटीस दिल्याचा राग मनात धरून अनुप कदम यांनी मद्यपान करून मंदिर संस्थान कार्यालायमध्ये येऊन तहसीलदार तथा व्यवस्थापक यांच्या नावे शिवीगाळ करत, धक्काबुक्की करत काचेची तोडफोड केली होती. या प्रकरणी तुळजापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याशिवाय १२ मे रोजीच्या मंदिर संस्थान कडून आलेल्या कारणे दाखवा नोटीशीला कोणतेही उत्तर अनुप कदम यांनी दिले नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन मंदिर संस्थानने सुरक्षा रक्षकांशी वाद घालणे, शिवीगाळ करणे, धक्काबुक्की करणे, तुळजाभवानी मंदिर संस्थान च्या मालमत्तेचे नुकसान करणे हे सर्व वर्तन अतिशय गंभीर स्वरूपाचे असून पुजारी व्यवसायास न शोभणारे असल्याचे स्पष्ट करत सदर प्रकरणी जबाबदार धरून देऊळ कवायत कायदा कलम २४ व २५ अन्वये पुढील ३ वर्षांकरिता मंदिर प्रवेशबंदीचा आदेश पारित करत कडक कारवाई केली आहे.

### जिल्हा संयोजकपदी देवकते यांची निवड

**धाराशिव, दि.१८ मे -**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि जन्म शताब्दी वर्षानिमित्त भारतभर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यांचे महान कार्य घरोघरी पोहचविण्याचे कार्य यानिमित्ताने करण्यात येणार असल्याचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ३०० वी जयंती समारोह जिल्हा समितीचे संयोजक इंद्रजित देवकते यांनी सांगितले. ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष दादासाहेब घोडके, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष दत्तात्रय सोनटक्के यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे भाजपा नेते आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले आहे.

### रहदारीस वाहनांचा आडथळा; गुन्हे दाखल

**धाराशिव, दि.१८ मे -**

उमरगा पोलीसांनी रहदारीस धोकादायकरित्या वाहने उभी करणाऱ्या चार व्यक्तींविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत. आरोपी लालासाहेब तांबोळी (४७, पुणे), खालीद भाजीवाले (३५, मुरुम), बालाजी वाघमारे (४५, उमरगा) आणि गोविंद भोसले (४१, रामपुर) यांनी १७ मे रोजी साठे चौक, अशोक चौक आणि आरोग्य कॉर्नर येथे रिक्षा सार्वजनिक रस्त्यावर धोकादायकरित्या उभ्या केल्या. उमरगा पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम २८५ अन्वये चार स्वतंत्र गुन्हे दाखल केले.



#### शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत

# विभाग स्तरावर जिल्ह्यातील ७ प्रथम, ७ द्वितीय,१ कार्यालय तृतीय क्रमांकावर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेत विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालयात धाराशिव जिल्ह्यातील ७ कार्यालयांना प्रथम क्रमांक,७ कार्यालयांना द्वितीय तर १ कार्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यांनी या उत्तम कामगिरीबद्दल या सर्व कार्यालयांच्या कार्यालय प्रमुख व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरीत तालुकास्तरीय शासकीय कार्यालयात धाराशिव जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालय, उमरगा, गटविकास अधिकारी कार्यालय, परंडा, तालुका वैद्यकीय अधिकारी, कळंब,

उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, धाराशिव, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, भूम, पोलीस निरीक्षक कार्यालय, उमरगा, बाल संरक्षण अधिकारी कार्यालय, धाराशिव या ७ कार्यालयांचा यात समावेश आहे.

तर द्वितीय क्रमांक आलेल्या तहसील कार्यालय, धाराशिव, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, भूम, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, धाराशिव, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उमरगा,

बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय (श), धाराशिव, उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम), तुळजापूर, उप अभियंता (जलसंपदा), पाटबंधारे उपविभाग क्र.८ लोहारा या कार्यालयांचा समावेश आहे.तर तृतीय क्रमांक उप अभियंता पाणीपुरवठा, भूम या कार्यालयांस मिळाला आहे.

## अंगणात झोपण्याच्या कारणावरुन हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

अंगणात झोपण्याचे कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठी, फळीने मारहाण करुन जखमी केले.

दिंडेगाव (ता. तुळजापूर) येथे १५ मे २०२५ रोजी रात्री ७ वाजता काकासाहेब पाटील, व्यंकटेश पाटील, अन्नपुर्णा पाटील, पांडुरंग पाटील, प्रेमाबाई पाटील यांनी प्रशांत हरी पाटील (वय ४०) यांना अंगणात झोपण्याच्या कारणावरून बेकायदा जमाव जमवून शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी व काठी-फळीने मारहाण करून जखमी केले. प्रशांत पाटील यांच्या फिर्यादीवरून १७ मे २०२५ रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## पाण्याची बाटली ठरली हाणामारीचे कारण; गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर व वाशी तालुक्यात किरकोळ कारणावरून दोन वेगवेगळ्या ठिकाणी प्राणघातक हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. पाण्याच्या बाटलीवरून वाद निर्माण होऊन या दोन प्रकरणांमध्ये लाथाबुक्यांसह लोखंडी रॉड, गज, तलवार यांचा वापर करत गंभीर मारहाणीच्या घटना घडल्याने खळबळ उडाली आहे



दि. १६ मे २०२५ रोजी रात्री ९.४५ वाजता तुळजापूर तालुक्यातील वडगाव लाख शिवारातील आईसाहेब हॉटेलवर विशाल अरुण जगताप (वय ३५, रा. वडगाव लाख) यांच्यावर संतोष दुधाभाते, गणेश भोसले व इतर एका इसमाने पाण्याची बाटली न दिल्याच्या कारणावरून वाद घालून प्राणघातक हल्ला केला. या हल्लयात विशाल जगताप यांना लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली असून त्यांच्या उजव्या पायावर तलवारीने वार करून गंभीर जखमी करण्यात आले आहे.

या प्रकरणावरून फिर्यादीच्या वैद्यकीय जबाबावरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १४ मे २०२५ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास वाशी तालुक्यातील पिंपळगाव (कुंभार) येथील तुळजाई लोकनाट्य कला केंद्रात अशोक हरीभाऊ गायकवाड (वय २७, रा. नाळवडी नाका, गांधी नगर, बीड) व त्यांच्या मित्रांवर आरोपी धनंजय मोटे, मन्सूर शेख, सिद्धांत मोटे, विनोद मोटे व इतरांनी पाण्याच्या बाटलीचे पैसे देण्याच्या कारणावरून वाद घालून शिवीगाळ करत लोखंडी रॉड, गज, लाकडी दांड्यांनी जबर मारहाण केली. यात फिर्यादी गंभीर जखमी झाले. या घटनेबाबत फिर्याद १७ मे रोजी दाखल करण्यात आली असून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वीजपुरवठा सुरळीत करा अन्यथा रुमणे घेऊन मोर्चा



### ॲड.शीतल चव्हाण फाउंडेशनचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

उमरगा शहर व परिसराला गेल्या अनेक वर्षांपासून वीजपुरवठ्याची समस्या भेडसावत आहे. सतत वीजपुरवठा खंडीत होणे, तासंतास विद्युतवीज नसणे, शेतकऱ्यांचे डी पी सतत जळणे अशा अनेक समस्यांनी मागच्या अनेक वर्षांपासून या भागातील शेतकरी व नागरिक त्रस्त आहेत. ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यात यावी यासाठी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, जग चंद्रावर, मंगळावर गेले पण उमरगा भागातील लोकांना अद्यापही मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत आहे. या गंभीर समस्येवर यापूर्वीही अनेकवेळा लिहून, बोलून, सांगून व निवेदने देऊन झाले आहे. पण तरीही परिस्थितीत सुधारणा होताना दिसत नाही. सध्या कडाक्याचा उन्हाळा व मध्येच अवकाळी पाऊस असे समिश्र वातावरण आहे.

विद्युतवीज नसल्याने रात्री अंधारात जागून काढणे आणि त्यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होणे अशा समस्या भेडसावत आहेत. शेतकरी व व्यापाऱ्यांची अनेक कामे वीजपुरवठ्याअभावी खोळंबली जात आहेत आणी त्यातून प्रचंड आर्थिक नुकसान होत असल्याचे म्हटले आहे. सामाजिक कार्यकर्ते ॲड. शीतल चव्हाण यांनी वरिष्ठांनी तात्काळ लक्ष घालावे अन्यथा रुमणे घेऊन मोर्चा काढू असा इशारा दिला आहे.

निवेदनावर सत्यनारायण जाधव, राजू भालेराव, राजू बटगिरे, ॲड. ख्वाजा शेख, ॲड. अर्चना जाधव, एस. के. चेले, ज्योती माने, बबिता मदने, शबाना उडचणे, किशोर बसगुंडे, धानय्या स्वामी, करीम शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## डॉ.विक्रमसिंह माने यांना प्रिन्सिपल ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने यांना प्लस ९१ मीडिया आयोजित आठव्या एज्युकेशनः इनोवेशन अँड टेक्नॉलॉजी समिट अँड अवॉर्ड अंतर्गत प्रिन्सिपल ऑफ द इयर फॉर इन्स्टिट्यूशनल एक्सलन्स पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट्स, टेक्निकल सर्टिफिकेशन्स व अद्ययावत तंत्रज्ञान आधारित कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक ई-कार, मानवी रोबोट, आरएफआयडी आधारित अटेंडन्स सिस्टीम यांसारखे प्रकल्प विकसित केले आहेत. या यशाबद्दल तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त तथा तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी अभिनंदन केले. डॉ. माने यांचे ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले असून, त्यांनी १५००+ विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक कार्यशाळा आणि २५००+ विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. तसेच, त्यांनी १०००+ प्राध्यापकांसाठी विकास कार्यक्रम, आणि ४०००+ विद्यार्थ्यांचे ऑनलाईन कोर्सेस पूर्ण करून घेतले आहेत. त्यांच्या पुढाकारामुळे दोन विद्यार्थ्यांना उद्योगासाठी बीज भांडवल मिळाले आहे.

त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मल्हार पाटील, विश्वस्त बाळासाहेब वाघ, समन्वयक गणेश भातलवंडे तसेच विद्यार्थी, प्राध्यापक व उद्योजकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मोटरसायकल चोरीच्या घटना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात मोटरसायकल चोरीच्या तीन घटनांनी नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. आनंदनगर, उमरगा आणि कळंब पोलीस ठाण्यांत या प्रकरणी भा. द. सं. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हे नोंदवले गेले आहेत.

आनंदनगर पोलीस ठाण्यांतर्गत, रवी भागवत शिंदे (वय ३२, रा. परशुराम कॉलनी, धाराशिव) यांची १०,००० रुपये किंमतीची हिरो होंडा स्प्लेंडर (एमएच २५ एक्स १३८०) ८ मे २०२५ रोजी दुपारी १.४० ते २.१० वाजेदरम्यान धाराशिव बसस्थानकातून अज्ञात व्यक्तीने चोरली. शिंदे यांच्या फिर्यादीनुसार १७ मे रोजी गुन्हा नोंदवला गेला. उमरगा पोलीस ठाण्यात, बालाजी चोखोबा कांबळे (वय ५५, रा. एकुरगा, ता. उमरगा) यांची २५,००० रुपये किंमतीची हिरो फॅशन प्रो (एमएच १३ बीटी ८४०१) १६ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.१५ वाजेदरम्यान कोशागार कार्यालयाजवळून चोरीस गेली. कांबळे यांनी १७ मे रोजी दिलेल्या खबरीवरून गुन्हा नोंदवला गेला.

कळंब पोलीस ठाण्यात, महेश गोपाळ सगट (वय ३५, रा. हारंगुळ, ता. जि. लातूर) यांची २५,००० रुपये किंमतीची होंडा ड्रिम युगा (एमएच १४ एचए ६३६०) १३ मे २०२५ रोजी दुपारी २ ते ५ वाजेदरम्यान गणपतरावजी कथले प्राथमिक शाळेजवळून अज्ञात व्यक्तीने चोरली.



**उमरगा :** भारतीय जनता पार्टीचे नुतन जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी शिवसेना उपनेते माजी आ.ज्ञानराज चौगुले यांच्या उमरगा येथील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, भाजपा नेते हर्षवर्धन चालुक्य, अजित पिंगळे, शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, माधव पवार, राजू पाटील, शिवसेना उपतालुकाप्रमुख चंद्रशेखर सूर्यवंशी, संदीप चौगुले आदी उपस्थित होते.

## वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी सहकुटुंब घेतले श्रीतुळजाभवानी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ मे -**

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी आज श्रीतुळजाभवानी मातेचे सहकुटुंब दर्शन घेऊन भवानीमातेची पूजा केली. वस्त्रोद्योग मंत्रीपद मिळाल्यानंतर पहिल्यांदाच ते श्रीतुळजाभवानी मातेच्या दर्शनास आले होते. यावेळी त्यांनी तुळजाभवानी मातेने सर्वकाही दिलेले असून मातेचा आशीर्वाद नेहमी सोबत रहावा अशी भावना व्यक्त केली.



यावेळी मंदिर संस्थान कडून तहसीलदार तुळजापूर तथा व्यवस्थापक श्रीतुळजाभवाणी मंदिर संस्थान अरविंद बोळंगे यांनी महावस्त्रे व देवीची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी जिल्हा रेशीम विकास अधिकारी आरती वाकुरे, मंदिर संस्थानचे सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, लेखापाल तेजस कराळे, जनसंपर्क अधिकारी गणेश निरवळ, प्रशांत जाधव व मंदिर संस्थान चे इतर कर्मचारी उपस्थित होते.

# खंबीर राजकीय वर्चस्व शुन्य; नळदुर्ग शहराची दुरावस्था

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ मे -**

ऐतिहासिक नळदुर्ग शहराची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. पिण्याच्या पाण्याचा खेळखंडोबा, शहरातील रस्त्यांची दुरावस्था, प्रशासनाची मनमानी या सर्व परीस्थितीमुळे नळदुर्ग शहराला कुणी वाली आहे की नाही हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शहरात खंबीर आणि दणकट नेतृत्व नसल्यामुळे शहराची अशी वाईट अवस्था झाली आहे.

एकेकाळी नळदुर्ग शहराचा सर्वच क्षेत्रात दबदबा होता. मग तो राजकीय असेल किंवा आणखी कोणतेही क्षेत्र प्रत्येक क्षेत्रात त्याकाळी नळदुर्गकर स्वता शहराच्या फायद्यासाठी निर्णय घेत होते. त्यामुळे तालुक्याच्या राजकारणातही नळदुर्गचा त्याकाळी दबदबा होता मात्र आज ती परीस्थिती राहिली नाही. नळदुर्ग शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या बोरी धरणात आज मुबलक पाणी असतांना तसेच हे बोरी धरण नळदुर्गच्या उशाला आसतांना आज शहरात बारा तेरा दिवस उलटुन गेले तरी शहरात पाणीपुरवठा होत नाही अशी भयानक स्थिती असतांना याबाबत कुणीच बोलायला तयार नाही.

याचा परीणाम म्हणुन आज शहरवासियांना विकत पाणी घेऊन आपली तहान भागवावी लागत आहे ही दुर्दैवाची बाब आहे. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांची अवस्था आज अतिशय वाईट झाली आहे. या रस्त्यावरून जाणे येणे मुश्किलीचे झाले आहे असे असताना नगरपालिका प्रशासन या रस्त्याचे काम करत नाही. आज शहरात ९३ कोटी रुपये खर्चाची रस्त्याची कामे होत आहेत. मात्र यामध्ये शहरातील एकाही रस्त्याचा समावेश नाही ही निंदनीय बाब आहे.आज नळदुर्गकरांना इतकाही अधिकार राहिला नाही की, प्राप्त झालेल्या निधीतुन कुठले काम करायचे आहे ते? इतकी वाईट अवस्था आज नळदुर्गकरांची झाली आहे. याला जबाबदार शहरातील नागरीकच आहेत. कारण जिथे चुकीचे काम सुरु आहे त्याविरोधात कुणी आवाज उठवीत नाही किंवा बोलतही नाहीत. आज कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे शहरात सुरु आहेत मात्र त्याचा फायदा नळदुर्गकरांना न होता तो दुसरेच घेत आहेत. या कामाचे ठेकेदार बाहेरचे, काम करणारे मजुर बिहारचे, कामे कोणते करायचे याचाही अधिकार शहरातील नागरीकांना नाही ही एक शोकांतीकाच आहे.

पुर्वीच्या काळात शहरातील नगराध्यक्ष असतील, नगरसेवक असतील किंवा विरोधी पक्षात काम करणारे त्या, त्या पक्षाचे पदाधिकारी असतील त्यांना एकप्रकारे मान होता. त्यांनी सुचविलेली कामे त्यावेळी होत होती आज ती परीस्थिती राहिली नाही, दबदबाही नळदुर्ग शहरातील प्रमुख राजकीय कार्यकर्त्यांनी राजकीय नेतृवावर ठेवला नाही याचा परीणाम आज शहर विकासापासुन दुर जात असल्याचे दिसुन येत आहे. नळदुर्ग शहराच्या विकासासाठी आज शासनाकडुन कोट्यावधी रुपयांचा निधी आलेला असताना नळदुर्ग शहर मात्र आजही विकासाच्या बाबतीत मागे का? याचा विचार शहरातील सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी नगरसेवक व नागरीकांनी करण्याची आज गरज आहे.

ही परीस्थिती बदलायची असेल तर शहरवासियांनी आज एक ठाम निर्धार करुन आपल्याच शहरातील एक राजकीय नेतृव पुढे आणणे गरजेचे आहे. यासाठी सर्वांनीच मान पान सोडुन शहराच्या विकासासाठी, शहराच्या भल्यासाठी, शहरवासियांना सर्व मुलभुत सुविधा मिळण्यासाठी, शहरातील बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्यासाठी, शहरात दररोज पाणीपुरवठा होण्यासाठी, आणि नळदुर्ग शहराचा तालुक्याच्या राजकारणात दबदबा निर्माण करण्यासाठी आपल्याच शहरातील एक राजकीय नेतृत्व पुढे आणणे गरजेचे आहे अन्यथा नळदुर्ग शहराचे भवितव्य अवघड आहे.

# वानवाडी, वारकवाडी शिवारात हजारो ब्रास मुरूम उत्खनन एटीएस यंत्राने मोजणी करण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**तामसा दि. १८ मे-**

हदगाव तालुक्यातील वानवाडी, वारकवाडी शिवारातील गायरान, वनजमीनी, माळरानातून अवैध मुरुम उत्खनन करून कमी ब्रासची रॉयल्टी काढून हजारो ब्रास मुरूमाची विल्हेवाट लावली जात आहे. महसूल खात्याचा महसूल बुडवण्याचा गोरखधंदा बिनबोभाटपणे चालू असून झालेल्या अवैध मुरुम उत्खननाची एटीएस यंत्राच्या साह्याने मोजमाप करून संबंधित कन्स्ट्रक्शनवर कारवाई करण्याची मागणी भारतीय आदिवासी पँथर संघटना महाराष्ट्र राज्य नांदेड जिल्हा पारधी समाजाचे जिल्हाध्यक्ष अशोक राठोड यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या एका निवेदनातून केली आहे.

हदगाव तालुक्यातील अनेक ठिकाणावर रॉयल्टी अत्यंत कमी मात्र तारखेची मर्यादा जास्त वाढवून घेऊन हजारो ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन करुन रात्रीबेरात्री वाहतूक केली जाते. त्यामुळे लाखोंचा महसूल शासनाच्या तिजोरीत जाण्याऐवजी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या घशात जात आहे. गौण खनिज संपत्तीच्या अवैध लुटीच्या विरोधात महसूल विभागाकडे खंडीभर तक्रारींचा ढिगारा पडला आहे. तहसिलदार खुद्द जायमोक्यावर जाऊन पाहणी करतात. परंतु कारवाई करीत नाहीत, ही शोकांतिका आहे. महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून अवैध वाळू आणि मुरूम वाहतूकीचा गोरखधंदा चालतो. पण उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठ्यांच्या हाप्तेखोरीमुळे कारवाई होत नाही. उदाहरण म्हणजे तामसा ते अर्धापूर रोडलगत वारकवाडी, वानवाडी शिवारात मालकी जमीन, गायरान जमिनीसह राखीव वन जमिनीत अवैधरित्या खोदकाम करून नॅशनल हायवे आणि रेल्वे रूळाच्या कामाच्या नावाखाली ५०० ब्रासच्या वेगवेगळ्या रॉयल्टी काढून हजारो ब्रास मुरमाचे नियमबाह्य उत्खनन व वाहतूक झाले आहे. तहसीलदारांच्या अधिकारातील ५०० ब्रास मुरमाची रॉयल्टी काढल्याचे सांगण्यात आले. गौण खनिज संपत्तीसंबंधीचे सगळेच नियम ढाब्यावर बसवून शासकीय सुट्टीच्या दिवशीही रात्रीला उत्खनन व वाहतूक करुन शासनाचा महसूल बुडवून फसवणूक केली जात आहे. गायरान आणि मालकीच्या जमिनी, माळरानावरील वृक्षतोड करून नैसर्गिक सौंदर्य उध्वस्त करून पर्यावरण दूषित करणाऱ्या त्या कन्स्ट्रक्शनवर कठोर कारवाई करावी. मुरूमाची एटीएस यंत्राने मोजमाप करावे, दोषी आढळल्यास त्या कन्स्ट्रक्शनचा परवाना रद्द करून काळ्या यादीत टाकावे. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची मागणी निवेदनात केली आहे.

# नांदेडला आज तिरंगा यात्रा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ मे-**

'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी कारवाईसाठी भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा गौरव आणि राष्ट्रीय एकतेची भावना अधिक दृढ करण्याच्या हेतूने सोमवारी १९ मे रोजी सायंकाळी ५ वा. नांदेड शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली स्थानिक व्हिआयपी रोडवरील डॉ. शंकरराव चव्हाण यांचा पुतळ्यासमोरील विशाल तिरंगा झेंड्यापासून निघणार असून, हनुमानपेठ (वजिराबाद) येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ त्याचा समारोप होईल.

जम्मू-काश्मिरातील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर अतिरेकी हल्ला झाल्यानंतर भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांवर हल्ला करून ते उद्धवस्त केले व सुमारे १०० अतिरेक्यांना यमसदनी पाठवले. भारतीय सैन्य दलाच्या समर्थनार्थ राज्यभरात अनेक ठिकाणी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, त्यानुसार नांदेड शहरातही ही रॅली निघणार आहे. सोमवारी निघणाऱ्या तिरंगा रॅलीत पालकमंत्री अतुल सावे, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे यांच्यासह अनेक आमदार, लोकप्रतिनिधी, डॉक्टर, वकील, व्यापारी, सामाजिक संस्था, माजी सैनिक, विद्यार्थी आदी सहभागी होणार आहेत. ही तिरंगा यात्रा निःस्वार्थपणे देशाची सेवा करणाऱ्या सैनिकांच्या अतुलनीय शौर्याचा सन्मान आणि बलिदानाला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आहे. राष्ट्रीय सुरक्षा व एकतेचा संदेश देण्यासाठी आणि दहशतवादाचा निषेध करण्यासाठी या तिरंगा रॅलीत राष्ट्रप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सोनखेड येथे कर्जमुक्ती साठी एल्गार मेळावा

**सोनखेड** -सोनखेड येथे दि १९ मे सोमवार रोजी सायंकाळी ६ वाजता बाजार मैदान येथे कर्ज मुक्ती एल्गार मेळाव्याचे आयोजन नांदेड जिल्हा क्रांतिकारी शेतकरी संघटना च्या वतीने आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रदेश युवक अध्यक्ष लक्षण मोरे व जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी दिली या मेळाव्यात शेतकऱ्यांचा सात बारा कोरा झाला पाहिजे, सोयाबीन ला ८ ते १० हजार भाव मिळाला पाहिजे, कपाशीला १० ते १४ हजार प्रति क्विंटल भाव मिळवून द्यावा, शेती मालाची बाहेर देशातून होणारी आयात तात्काळ थांबवावी या सह अनेक मुद्दे या कर्जमुक्ती शेतकरी एल्गार मेळाव्यात चर्चा होणार असून या मेळाव्यास प्रमुख उपस्थिती तथा मार्गदर्शन मा रविकांत तुपकर संस्थापक अध्यक्ष वस्त्र उद्योग महामंडळ अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा महाराष्ट्र राज्य, प्रदेश अध्यक्ष मा राजीव कसबे.प्रदेश युवा अध्यक्ष मा लक्ष्मण मोरे, युवती प्रदेश अध्यक्ष कु.अश्विनी म्हात्रे, मराठवाडा विभाग अध्यक्ष गजानन कावरखे, विदर्भ अध्यक्ष मा किरण ठाकरे, मा सत्तार पटेल, अरुण कुलकर्णी, मा राजेंद्र मोरे, इत्यादी मान्यवर यांचे मार्गदर्शन लाभणार असून या मेळाव्यास लाखोच्या संख्येने शेतकरी बांधवानी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी केले आहे

### मुदखेड येथील सरदार वल्लभाई पटेल हायस्कूल दहावीचा निकाल ८२.१४ टक्के

**मुदखेड** -मुदखेड येथील सरदार वल्लभाई पटेल हायस्कूल चा एस.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२५ परीक्षेत विद्यालयाने उच्च यश कायम राखले



असून विद्यालयाचा निकाल ८२.१४ लागला आहे दहावीच्या परीक्षेला एकूण ५६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्यास १० विद्यार्थी उत्तीर्ण तर प्राथमिक श्रेणीत १४ विद्यार्थी उत्तीर्ण तसेच द्वितीय श्रेणीमध्ये १० उत्तीर्ण व १२ उत्तीर्ण असे एकूण ४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले शाळेतून शेख नोमान ८९% गुण घेऊन प्रथम आला आहे तर द्वितीय कु.केशेवार सानिका कैलास हिने ८७.४०% कु. अनुष्का बाळकृष्ण चौदंते ८६.४० गुण घेऊन तृतीय आली आहे. एस एस सी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष केशवराव कदम,संचालक नारायण गैनवाड, गोविंद प्रसाद कालानी, पापालाल शर्मा, माधवराव पचलिंग, आंबेगावकर व शाळेचे मुख्याध्यापक जयकुमार बेंबडे, विद्यालयातील शिक्षकवृंद, तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### शिपाई पदावर नियुक्तीसाठी दिव्यांग अनिल पवार यांचा आत्मदहनाचा इशारा

**नांदेड** -मुखेड नगर परिषदेमध्ये शिपायाची जागा रिक्त झाली असून त्या जागेवर शिपाई म्हणून नियुक्ती करून घ्यावे अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. २६ मे २०२५ रोजी आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिव्यांग व्यक्ती अनिल पवार यांनी जिल्हा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. जिल्ह्यामध्ये दिव्यांगांना कुठल्याच प्रकारची सुविधा उपलब्ध होत नाही व योजनाही वेळेवर मिळत नाही त्यामुळे त्यांना उपासमारीची वेळ येत आहे. असाच एक दिव्यांग असलेल्या मुखेड तालुक्यातील होकर्णा तांडा येथील अनिल बाबुराव पवार यांना मुखेड येथील नगर परिषदेमध्ये शिपाई पदाची जागा रिक्त झाली असून त्या जागेवर कायमस्वरूपी नियुक्ती द्यावी अशी मागणी पवार यांनी जिल्हाधिकारी व मुखेड नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नगर परिषदेत मुखेड येथे दिव्यांग शिपाई पदाची जागा भरण्यात आली नाही. त्यासाठी दिव्यांग जागा भरण्यायावी व पवार यांना नियुक्ती न दिल्यास अनिल बाबुरा पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालसमोर दि. २६ मे रोजी आत्मदहन कररण्याचा इशारा त्यांनी दिला.

### बुद्ध जयंतीनिमित्त उद्या १९ रोजी खुरगावला विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेडे** -तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात दरमहा पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. बुद्ध जयंतीनिमित्त उद्या १९ मे रोजी ६० श्रामणेर व भिक्खू संघाच्या उपस्थितीत सकाळपासूनच परित्राणपाठ, धम्मध्वजारोहण, त्रिरत्नवंदना, बोधीपुजा, सूत्तपठण, ध्यानसाधना, धम्मदेसना, व्याख्यान, भोजनदान, आर्थिक दान पारमिता आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रशिक्षण केंद्राचे संचालक, ऑल इंडिया भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली. ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात बुद्ध जयंतीनिमित्त आज पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गृहत्यागानंतर सिद्धार्थांनी सत्याच्या शोधासाठी सात वर्ष कठोर तपश्चर्या व साधना केली आणि त्यांना त्यानंतर त्यांना बोधगया येथील एका-बोधिवृक्षाखाली बुद्धत्व किंवा ज्ञानप्राप्ती झाली. ही घटना वैशाख पौर्णिमेला झाली. तेव्हापासून हा दिवस बुद्ध पौर्णिमा म्हणून ओळखला जातो. बुद्ध जयंती हे पर्व वर्षातील सगळ्यात पवित्र आणि महत्त्वाची मानले जाते. बुद्ध पौर्णिमा तीन कारणांसाठी विशेष आहे. हा विशेष योगायोग म्हणजे वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गौतम बुद्धांचा जन्म झाला होता. याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते, असे सांगितले जाते. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांत साजरी केली जाते. त्यामुळे बौद्ध धर्मियांमध्ये बुद्ध पौर्णिमेला अनन्य साधारण महत्त्व आहे. या निमित्ताने १९ मे रोजी सकाळपासूनच अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर चालणाऱ्या या कार्यक्रमांसाठी भिक्खू संघासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

# शंभर दिवस सुधारणा उपक्रमात देगलूर उपविभाग ठरला विभागीय स्पर्धेत प्रथम

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १८ मे-**

महाराष्ट्र शासनाच्या '१०० दिवस सुधारणा कार्यक्रमात' देगलूर उपविभागीय कार्यालयाने नांदेड जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करत विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे.याच्या कार्याचा गौरव उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या नेतृत्वाखालील कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उपक्रमाच्या अंतिम मूल्यमापनानुसार देगलूर उपविभाग कार्यालयाने कार्यक्षमता, सेवा जलदगतीने देणे, डिजिटल प्रक्रिया आणि नागरिकाभिमुखता या बाबतीत इतर उपविभागांना मागे टाकत उल्लेखनीय प्रगती केली आहे. अनुप पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी नागरिक, व्यापारी, व असंघटित कामगार यांच्या



अडचणी समजून घेत त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी जात व नॉन क्रिमिलिअर असे अनेक प्रमाणपत्रे तात्काळ उपलब्ध करून देत, कार्यालयीन प्रक्रियेत गती आणली.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर उपविभागीय कार्यालयाने १०० दिवसांत विविध सुधारणा अंमलात आणल्या. डिजिटल सुविधा, स्वच्छता, वेळेवर सेवा आणि नागरिकाभिमुखता यावर विशेष भर देण्यात आला.

विभागीय पातळीवर प्रथम क्र.पटकावल्याबद्दल बोलताना उपविभागीय अधिकारी अनुप पाटील म्हणाले, या यशाचे श्रेय सर्व घटकांना जात असून, आम्ही सदैव याचं जोमाने कार्य चालू ठेवू. हे यश म्हणजे समस्त तालुक्यासाठी गौरवाची बाब आहे. नागरिकांची सेवा करण्यासाठी कटिबद्ध आहोत.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात राज्याच्या सर्व ३५८ तालुक्यातील १०,००० शासकीय कार्यालयांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

सर्व शासकीय विभागांच्या प्रत्येक महसूली विभागातील उत्कृष्ट ३ तालुका कार्यालयांची निवड आज जाहीर झाली आहे.

वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर या सर्वच तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन केलं जातं आहे.

## पटणे विद्यालयाचा ९७ टक्के निकाल

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १८ मे-**

मंगळवार दि.१३ मे रोजी दुपारी शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर दहावी बोर्ड सन २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यात बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील महाळप्पा पटणे विद्यालयाचा निकाल ९७.९० टक्के निकाल लागला असून त्यामध्ये ३६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कु.कांचन सुरेश हांद्रे ९१.८०% गुण घेत शाळेतून सर्वप्रथम आली तर संयुक्त द्वितीय क्रमांकावर दोन विद्यार्थी त्यापैकी एक कु.वैष्णवी शंकर चिगळे हिने ९०.६०% तर रोहित रवी भुरे याने पण ९०.६०% व तृतीय क्र. बामणे ईश्वर आनंदा ९०.२०% गुण प्राप्त करत यश मिळविले आहे.प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांसह सर्व उयशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

# सूंदर गाव निवडीसाठी जिल्हास्तरीय पथकाकडून तपासणी करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १८ मे-**

आर.आर.(आबा)पाटील सूंदर गाव म्हणून तालूकास्तरीय पूरस्कारासाठी ग्रा.पं.नारवट ता.भोकर या गावाची निवड केली होती.जिल्हास्तरीय पूरस्कारासाठी नारवट ग्रा.पं.स्पर्धेत असताना जिल्हास्तरीय तपासणी पथक नारवट येथे येवून तपासणी करणे आवश्यक होते. पथकाकडून कसल्याही प्रकारची तपासणी




न करता जिल्हा परिषदेने स.न.२०२२-२३ या वर्षाकरिता ग्रा.पं.येरगी ता.देगलूर तर स.न.२०२३-२४ या वर्षाकरिता ग्रा.पं.हानेगाव ता.देगलूर व ग्रा.पं.सगरोळी ता.बिलोली यांना विभागून आर.आर.(आबा)पाटील सूंदर गाव पूरस्कार घोषित करण्यात आला जिल्हास्तरीय पूरस्काराकरिता नारवट ग्रा.पं.स्पर्धेत पात्र असून जिल्हास्तरीय पथकाने तपासणी न करताच वरिल गावांची निवड केल्याचा संशय असल्याचे मत नारवट चे सरपंच रामदास जोंधळे यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले. झालेली निवड संशयास्पद असून जिल्हास्तरीय पथकाकडून फेर तपासणी करुन आर.आर.(आबा)पाटील सूंदर गाव जिल्हास्तरीय पूरस्कारासाठी पात्र असणाऱ्या गावची निवड करण्यात यावी अशी मागणी नारवट येथील सरपंच रामदास जोंधळे व उपसरपंच नागोराव झाडे यांनी मूख्यकार्यकारी अधिकारी नांदेड यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# केसराळीचे वारकरी राजू पांचाळ नांदेड जिल्हा संघटक पदी

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १८ मे-**

बिलोली तालुक्यातील ग्राम केसराळी येथील भारतीय जीवन बीमा निगम प्रतिनिधी तथा वैष्णव भक्त वारकरी ह.भ.प.राजू राचन्ना पांचाळ यांची नुकतीच अखिल भारतीय वारकरी महासंघ महाराष्ट्र यांच्याकडून नांदेड जिल्हा संघटक पदी एकमताने निवड करण्यात आली.

येथील परिसरातील राजू पांचाळ वारकरी संप्रदायातील धार्मिक कार्यात सदैव अग्रेसर असतात. सर्वधर्मीय सामूहिक विविध सप्ताहात व्यवस्थापक आयोजक प्रमुख म्हणून त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

# ग्रामीण भागातील अलौकिक बुद्धिमत्ता
# सामान्य कुटुंबातला ओमप्रकाश यादवकर ९७ टक्के गुण घेऊन अव्वल

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ मे-**

परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणत्याही मर्यादा ओलांडता येतात, याचे जिवंत उदाहरण किनवट येथील ओमप्रकाश दिपक यादवकर यांनी घालून दिले आहे. अत्यल्प संसाधनांमध्ये शिक्षण घेऊन ओमप्रकाशने दहावी परीक्षेत तब्बल ९७.८० टक्के गुण प्राप्त करत किनवट तालुक्यात अग्रस्थान पटकावले आहे. त्यांच्या या घवघवीत यशाने संपूर्ण नाभिक समाजासह तालुक्यातील सर्वच स्तरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



दिपक यादवकर हे किनवट शहरात केशकर्तनालय चालवतात. मितभाषी, विनम्र आणि सहकार्यशील स्वभावाचे दिपक यादवकर यांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह प्रामाणिकपणे केला आहे. आपल्या मुलांनी शिक्षणाच्या माध्यमातून उज्वल भवितव्य घडवावे, ही त्यांची सदिच्छा ओमप्रकाशने खरी करून दाखवली आहे.

ओमप्रकाशने मिळवलेले यश केवळ व्यक्तिगत किंवा कौटुंबिक पातळीवर मर्यादित राहिले नसून, त्याने संपूर्ण नाभिक समाजातील तरुणांना नवीन दिशा दिली आहे. पारंपरिक व्यवसायासोबतच विज्ञान, वैद्यकीय, प्रशासकीय तसेच इतर स्पर्धात्मक क्षेत्रातही समाजबांधवांनी वाटचाल करावी, हा संदेश ओमप्रकाशच्या यशातून उमटत आहे.

ओमप्रकाशच्या यशाबद्दल किनवटचे आमदार आ. भिमराव केराम, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, श्रीराम कंस्ट्रक्शनचे श्रीनिवास नेम्मानिवार, नाभिक समाज संघटनेचे सिताराम राचटवार, अतुल हळदकर, अजय हळदकर, अमोल हळदकर, विजय पोलसवार, गोकुंदा ग्रामपंचायतीचे सदस्य ज्योतिबा गोणारकर, अतुल दर्शनवाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

दरम्यान दैनिक तरुण भारतशी बोलताना दिपक यादवकर म्हणाले, आम्ही आमच्या वडिलोपार्जित व्यवसायात आलो. परिस्थितीने आम्हाला या व्यवसायात आणले. याच व्यवसायाने आम्हाला हक्काची भाकर दिली आहे. त्यामुळे हा व्यवसाय वाईट किंवा कमी दर्जाचा कधीच मानला नाही. पण आमची इच्छा आहे की आमची मुले शासकीय नोकरी, वैद्यकीय, विज्ञान किंवा इतर क्षेत्रात प्रगती करून आपले व कुटुंबाचे नाव उज्वल करावे. अशी अपेक्षा दिपक यादवकर यांनी व्यक्त केली.

# आ. चिखलीकर यांच्यामुळे अपघातातील रुग्णाला एक लाख रुपयाचे अर्थसहाय्य मंजूर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १८ मे-**

वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून एक लाख रुपये मंजूर करण्यात आले. बालाजी बापूराव हारगावकर रा.माळेगाव यात्रा ता.लोहा जि.नांदेड यांचा काही दिवसापूर्वी मोटरसायकल स्लीप होऊन अपघात झाला होता. त्यांना उपचारासाठी यशोसाई हॉस्पिटल, नांदेड येथे उपचार चालू होते. खाजगी दवाखाना असल्यामुळे जास्त खर्च लागत होता. पण गरीबी परिस्थिती असल्यामुळे उपचारासाठी पैसे नव्हते. लोहा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांना माळेगावचे सरपंच हनमंत धुळगंडे व दशरथ मोरे यांच्यामार्फत आ.चिखलीकर यांना कळवुन मुख्यमंत्री सहायता निधीचे पत्र घेतले व त्यांना मदत मिळावी



यासाठी आ.चिखलीकर यांनी संबंधित अधिकाऱ्याला फोन करुन मदत मिळावी यासाठी प्रयत्न केले.

यावेळी बालाजी हरगावकर यांना मंजूर एक लाखाचे पत्र देताना माळेगावचे आदर्श सरपंच हनुमंत रुस्तुमराव धुळगंडे, चेअरमन राधाकिशन फुगणर, दशरथराव मोरे (जोशी समाज जिल्हाध्यक्ष), नामदेव निलेवाड, बंडू वाघमारे, व गावकरी मंडळी यांनी मदतीचे पत्र देऊन गावकरी यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे आभार मानले.

# दाव्याचा निकाल विरोधात लागल्याचा राग मनात धरुन मारहाण ; ३९ जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ मे-**

दाव्याचा निकाल विरोधात लागल्याचा राग मनात धरुन सांगवी येथील केशव गोविंद थोरात व विनोद केशव थोरात यांना जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण करण्याची घटना घडली असून, या प्रकरणी ३० जणांविरुध्द ॲट्रासिटी ॲक्टअंतर्गत विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिध्दार्थनगर सांगवी येथील केशव गोविंद थोरात हे त्यांच्या कुटुंबियासह राहतात. त्यांच्या नावावर जयभवानी नगर येथील १३७ क्रमांकाचा प्लॉट नावावर आहे. मागील तेरा वर्षापासून त्या जागेवर त्यांचा मालकी ताबा आहे. या जागेवर त्यांचा मुलगा विनोद थोरात वॉटर सर्व्हिसिंगचे काम करतो. या जागेच्या संदर्भाने राजेंद्र पुंजाराव कदम यांनी त्यांच्या विरोधात दोन क्रिमिनल व तीन सिव्हील दावे दाखल केले होते. या दाव्यापैकी तीन दाव्याचा निकाल केशव थोरात यांच्या बाजूने लागल्याने दि.२० मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास केशव थोरात व त्यांचा मुलगा विनोद थोरात दुकान बंद करीत असताना डॉ.राजेंद्र पुंजाराव कदम, बालाजी गाडे, रामराव बाबाराव मिराशे, सुमित बालाजी गाडे, अमित गाडे, योगेश गाडे, पुंजाराव कदम, शुभंम बालाजी गाडे, मुंगल व अन्य ३० जणांनी त्यांना जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच केशव थोरात यांच्या खिश्यातील ९३० रुपये काढून घेतल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. केशव थोरात यांनी तातडीने ११२ क्रमांकाला फोन लावल्यामुळे पोलीस घटनास्थळी दाखल झाल्याने पोलिसांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी केशव थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ३० जणांविरोधात विमानतळ पोलीस ठाण्यात दि.१७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सधनता आणि सक्षमता योगामुळेच

## योगगुरू स्वामी परमार्थ देव महाराज यांचे प्रतिपादन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मे**
सधन आणि सक्षम लोकच देशाची सेवा करू शकतात आणि योगामुळे सधनता व सक्षमता येऊ शकते असे प्रतिपादन पतंजली योग पिठाचे मुख्य केंद्रीय प्रभारी आणि परमार्थ देव यांनी केले.

हिंगोली येथे तीन तीन दिवसीय योग शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते मार्गदर्शन करीत होते. दीप प्रज्वलनाने या योग शिबिराचा प्रारंभ झाला. यावेळी आमदार तानाजीराव मुटकुळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, रामचंद्र कयाल, गोदावरी अर्बन मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह पतसंस्थेचे व्यवस्थापक प्रमोद देशपांडे, पतंजलीच्या भारत स्वाभिमानचे प्रांत अध्यक्ष दिनेश राठोड, पतंजलीचे प्रांत अध्यक् अनिल अमृतवार, युवा भारतचे प्रांत प्रभारी शंकरजी नागापुरे, किसान सेवा प्रभारी निळकंठ साबळे, प्रांत कोषाध्यक्ष प्रदीप काटेकर, सह कोषाध्यक्ष प्रल्हाद सुलताने, राज्य कार्यकारिणीचे सदस्य अशोक मुंदडा पंढरीनाथ कंठेवाड संजय टाकले सत्यनारायण अनमदवार कुंडलिकराव निर्मले, महिला पतंजली योग समितीच्या प्रांत प्रभारी संजीवनी माने राज्य कार्यकारणी सदस्य माधुरी शास्त्री आदींची मंचावर उपस्थिती होती.

अनादी काळापासून असलेले योगाचे महत्त्व स्वामी रामदेवजी महाराज यांनी पुनर्जीवित केले असे सांगून उपस्थितांकडून त्यांनी योगासन प्राणायाम करून घेतला. छोट्या छोट्या आजारापासून गंभीर आजारापर्यंत सर्व रोग दूर होत असल्याचा विश्वासही देशवासी या सहज जगामध्ये वाढत आहे. योग विज्ञान हे संपूर्ण रोगाचे समाधान आहे. शारीरिक मानसिक रोगासह वैयक्तिक व राष्ट्रीय चरित्र निर्मिती देखील योगानेच प्राप्त होते. भारतीय शिक्षा बोर्ड च्या माध्यमातून पतंजलीने भारतीय संस्कृती आणि संस्काराचे देखील पुनर्जीवन होत असून बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी देखील पतंजली कार्य करीत आहे. सर्वांगीण विकास महाराष्ट्रातील अठरा जिल्ह्यातील पतंजलीच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हा व शहरातून मोठ्या संख्येने योगसाधक शिबिरास दोन हजार साधक उपस्थित होते. पहेलगाम येथील अतिरेकी हल्ल्यामध्ये व ऑपरेशन सिंदूर मध्ये शहीद झालेल्या सैनिकांना यावेळी श्रद्धांजली देखील अर्पण करण्यात आली. पुढील दोन दिवस देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पतंजली भारत स्वाभिमानचे जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, मनमत गूमटे, ज्ञानदेव गुट्टे, राजकुमार टिळे, बालासाहेब हरण, अशोक पवार, उमेश तोष्णीवाल, एकनाथ बांगर, बाबूराव पारसकर, गजानन खंदारे, ज्योती वाघमारे आदींनी केले.

# योग सवयीचा भाग बनवावा जिल्हाधिकारी राहूल गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मे**
पतंजली योग पिठाचे मुख्य केंद्रीय प्रभारी स्वामी परमार्थ देव जी महाराज यांच्या उपस्थितीत पतंजली योग समितीच्या वतीने आयोजित हिंगोली येथील तीन दिवसीय योग शिबिराच्या कार्यक्रमात हिंगोली चे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी भेट दिली. यावेळी बोलताना त्यांनी योगाचे महत्त्व विशद करताना योग हा सवयीचा भाग बनवण्याच्या आवाहन उपस्थितांना केले.

कोरोनाच्या काळामध्ये स्वतःसह अनेक लोकांना योगाचा फायदा झाल्याचे देखील त्यांनी नमूद केले. राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील सर्वांनी मोठ्या प्रमाणात योग प्रचार प्रसार करण्यास मदत केली तर निरोगी आणि बलशाली भारत बनवण्यासाठी मोलाची मदत होऊ शकते असे स्वामी पुढे परमार्थ देव यांनी म्हटले. दुसऱ्या दिवशी या दिपप्रज्वलन समारंभाच्या वेळी शहरातील प्रसिद्ध व्यापारी सुभाष तापडिया, गजेंद्र बियाणी, सुरेशआप्पा सराफ, एडवोकेट पद्माकर पुरी, माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, डॉक्टर संतोष कल्याणकर, विलास काळे, पतंजलीचे राज्य कार्यकारिणीचे सदस्य संजय चाफले, सत्यनारायण अनमदवार, माधुरी शास्त्री व्हि. डी. देशमुख, अशोक ठेंगल आदींची उपस्थिती होती. भारताचे भविष्य निरोगी राहावे यासाठी विशेषता: बालकांना व उपस्थित माता-पितांना आज योग मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय पातळीवरील योगासनपटू नकुल डांगे याने मंचावर कठीण योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला पतंजली योग समितीच्या राज्य प्रभारी संजीवनी माने यांनी केले. शिबिराच्या समारोपीय दिवसासाठी देखील शहरातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पतंजली भारत स्वाभिमानचे राज्य प्रभारी दिनेश राठोड यांच्यासह संपूर्ण राज्य कार्यकारणी व जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, मन्मथ घुमटे, राजकुमार टिळे, ज्ञानदेव गुठे, प्रणत अग्रवाल, ज्योती वाघमारे यांनी केले.

# पतंजलीने मराठवाड्यात मोठा उद्योग सुरू करावा- मेघना बोर्डीकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मे**
सर्व क्षेत्रात पतंजली देश हितास्तव वेगवेगळे उद्योग व्यवसाय सुरू करीत असून मराठवाड्यासारख्या मागास भागात देखील पतंजलीने मोठा उद्योग सुरू करावा असे साकडे राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी हिंगोलीत पतंजलीच्या कार्यकर्ता बैठकीत स्वामी परमार्थ देव यांच्यामार्फत बाबा राम देवांना घातले.




तीन दिवसीय योग शिबिराच्या निमित्ताने पतंजली योग पिठाचे मुख्य केंद्रीय प्रभारी स्वामी परमार्थ देवजी हिंगोलीत असून महाराष्ट्रातील पतंजलीच्या पदाधिकारी व साधकांची बैठक हॉटेल शांती येथे आयोजित करण्यात आली होती त्या बैठकीमध्ये त्या बोलत होत्या. बाबा रामदेव यांचे परम शिष्य तथा पतंजली पिठाचे मुख्य केंद्रीय प्रभारी स्वामी परमार्थ देव यांच्यासह माजी आमदार गजाननराव घुगे, माजी आमदार रामरावजी वडकुते, भारत स्वाभिमान चे राज्य प्रभारी दिनेश राठोड यांच्यासह व पतंजलीचे सर्व राज्य प्रभारी व राज्य कार्यकारणी सदस्य मंचावर उपस्थित होते.

पतंजलीच्या माध्यमातून स्वामी रामदेवजी महाराज यांनी घराघरात योग आयुर्वेद व स्वदेशी पोहोचवली असून घराघरात योग साधक निर्माण होत आहेत आणि त्यामुळे राज्याच्या आरोग्य सेवेवरील खर्च कमी होत आहे ही अत्यंत चांगली बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. बैठकीचे प्रास्ताविक राठोड यांनी केले तर स्वामी परमार्थ देव यांनी देखील उपस्थित त्यांना प्रसंगोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोळंके शिवशंकर नागापुरे तर आभार प्रदर्शन राजकुमार टिळे यांनी केले.



**हिंगोली- येथील तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार योजनासह इतर योजनांमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी निराधार महिला, वृध्द तसेच विधवा महिला यांनी कार्यालयात कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी कागदपत्रे दाखल करतांना निराधार योजनेतील लाभार्थी दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त


### ३१ मे ला नागेशवाडीत धम्म परिषदेचे आयोजन



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील नागेश वाडी येथे ३१ मे रोजी ८ वी बौद्ध धम्म परिषद चे आयोजक करण्यात येणार असून त्या अनुषंगाने आज दिनांक १८ मे रोजी हिंगोली येथील शासकीय विश्रामगृह येथे संबोधी अकादमीचे संस्थापक अध्यक्ष भीमराव हत्तीआंबिरे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी सिद्धार्थ भराडे, बंडू नरवाडे, बाळासाहेब कीर्तने, रोहिदास साखरे, एकनाथ खंदारे, राहुल वाघमारे, रमेश फाले, शशिकांत हत्तीअंभिरे, पद्मानंद सोनकांबळे, अक्षय इंगोले, राजू खंदारे, बाबासाहेब भराडे, प्रा किशोर इंगोले, गौतम श्रावणे, संबोधी अकादमीचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते शासकीय विश्रामगड येथे उपस्थित होते. ८ व्या बौद्ध धर्म परिषदेला जास्तीत जास्त बौद्ध अनुयायानी उपस्थित राहण्याचे आवाहन संबोधी अकादमीचे संस्थापक अध्यक्ष भिमराव हत्तीअंभिरे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

{XA}

### औंढा नागनाथ तालुक्यात अवकाळी पाऊस



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यासह शहरांमध्ये अवकाळी पावसाने शनिवारी सायंकाळच्या सुमारास हजेरी लावली. वादळी वारा, मेघगर्जनासह विजेचा कडकडाट व अवकाळी जोरदार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील वाळू घातलेल्या भुईमुगाच्या शेंगा भिजल्या असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दुपारी तीनच्या दरम्यान एक तासभर वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाट व अवकाळी जोरदार पाऊस झाला आहे. त्या पावसामुळे शेतशिवारासह रोडच्या कडेला पाण्याचे डबके साचले आहेत. अवकाळी पावसामुळे उकाडा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यातच वादळी वारा व अवकाळी पाऊस आल्याने विज खंडीत झाल्याने उकाड्यात प्रचंड वाढ झाली. नागरिकांना चांगलाच घाम फुटला. जिल्ह्यात दिवसभर उन्हाची तीव्रता तर सायंकाळी अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे.

# पार्डी पोहकर येथे वीज पडून महिला ठार, जांबआंधमध्ये चौघे जखमी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मे**
शनिवारी दुपारी जिल्ह्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. यावेळी सेनगाव तालुक्यातील पार्डी पोहकर येथे शेतात वीज कोसळून एका महिलेचा मृत्यु झाला तर जांब आंध येथे चौघेजण जखमी झाले आहेत. तर हत्ता व खडकी येथे तीन गायी दगावल्याची घटना घडली आहे.

हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ, कळमनुरी तसेच सेनगाव तालुक्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. यावेळी वीजेच्या कडकडाटासह पाऊस पडला. सेनगाव तालुक्यातील पार्डी पोहकर येथे मुक्ताबाई गिरी वय ४० ह्या शेतात काम करीत होत्या. अचानक वीजेच्या कडकडाट व वाऱ्यामुळे त्या घरी जाण्यासाठी निघाल्या. मात्र याचवेळी पाऊस सुरू झाल्यामुळे त्या झाडाखाली थांबल्या. यावेळी वीज कोसळून त्यांचा मृत्यु झाला. पाऊस येत असतानाही त्या घरी का आल्या नाही हे पाहण्यासाठी त्यांचे कुटुंबीय शेतात गेले असता त्यांचा मृतदेह एका झाडाखाली आढळून आला. या घटनेची माहीती गावकऱ्यांना मिळाल्यानंतर गावकऱ्यांनी त्यांना सेनगाव येथील ग्रामीण रूग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल केले होते.

दुसऱ्या एका घटनेत सेनगाव तालुक्यातील जांब आंध येथे शेतात वीज कोसळून रूख्मीना मनोहर बंदुके, अंकीता संतोष बोडखे, नंदाबाई किसन बोडखे, संतोष किशन बोडखे हे जखमी झाले आहेत. अंकीता बोडखे ह्या गरोदर आहेत. या सर्वांना उपचारसाठी सेनगावच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल केले आहे. रूख्मीना यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी हिंगोली येथील सामान्य रूग्णालयात हलविले आहे. तहसीलदार देवराव कारगुडे यांच्या पथकाने भेट देऊन पाहणी केली तसेच पंचनामे केले आहेत.

सेनगाव येथील खडकी येथे एक गाय दगावली तर हत्ता येथे गोशाळेजवळ वीज कोसळल्याने दोन गायी दगावल्या आहेत. हिंगोली तालुक्यातील पेडगाव येथे दिगंबर बेले यांच्या घरावरील पत्रे उडून गेली. त्यात एक बैल जखमी झाला आहे.

# शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयाचा दहावीचा निकाल ९०.१५ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मे**
भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थाद्वारा संचलीत श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयाचा दहावीचा निकाल ९०.१५ टक्के लागला असून या विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

शहरातील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयाचा दहावीचा ऑनलाईन निकला नुकताच जाहीर झाला असून या शाळेतून मार्च २०२५ दहावीच्या परीक्षेला तब्बल ३७६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ३३९ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून उत्तीर्णतेची टक्केवारी ९०.१५ एवढी आहे. विशेष म्हणजे या विद्यालयात सेमी इंग्लीश, मराठी तसेच सीबीएससी तीनही माध्यम असून विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिल्या जातो. एकीकडे पालक हजारो रूपये शुल्क भरून पाल्यांना सीबीएससी तसेच इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देत असतांना मागील अनेक वर्षापासून या विद्यालयात अनुभवी शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्या माध्यमातून मोफत प्रवेश देऊन उत्कृष्ट अध्यापनाचे कार्य केले जात आहे. विद्यालयाने मागील शैक्षणिक वर्षात कला, साहीत्य, खेळ तसेच विज्ञान प्रदर्शन, गणित स्पर्धा, पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा एनएमएमएस यासारख्या स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. त्यामुळे या विद्यालयात प्रवेशासाठी पालक लोकांचा कल जास्त असल्याचे दिसत आहे.

दहावीच्या परीक्षेत शहरातून सर्वात जास्त विद्यार्थी बसले होते. तरीही या विद्यालयाचा निकाल ९०.१५ टक्के एवढा लागला आहे. त्यामध्ये विशेश प्राविण्यासह ९० विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ११३ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर केवळ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या ३८ आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव तसेच संचालक मंडळ, मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, पर्यवेक्षक तुळशीदास चिलमुल यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# कृषी निविष्ठा दुकानांची मे अखेर पर्यंत तपासणी करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १८ मे**
यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील शेतक-यांना बियाणे व खताची खरेदी करताना कंपन्यामार्फत कृषी केंद्र संचालकांकडून लिंकींग करण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच सर्व कृषी निविष्ठा दुकानदारांची मे अखेरपर्यंत तपासणी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज आढावा बैठकीत संबंधित अधिका-यांना दिले.



बैठकीला आमदार तानाजी मुटकुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, तालुका कृषी अधिकारी व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम २०२५ ची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी जिल्ह्यातील खरीप हंगामातील तयारी, बियाणे व खतांची उपलब्धता, कृषी योजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पीक विमा व अतिवृष्टी अनुदानाच्या प्रलंबित लाभार्थ्यांची ई-केवायसी तात्काळ करुन त्यांना अनुदानाचे वितरण करावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या विहिरींना मागेल त्याला सौर पंप योजनेतून तात्काळ वीज जोडणी द्यावी. यासाठी योग्य कंपनीची निवड करावी. गारपिटीमध्ये नुकसान झालेल्या सोलारचे सर्वेक्षण करुन ते तात्काळ दुरुस्त करावेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, एसआरएलएम आदी योजनेच्या प्रलंबित प्रस्तावाची बँकनिहाय माहिती तयार करुन द्यावी व ती प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत, अशा सूचना केल्या.

या वर्षी जिल्ह्यासाठी ७३ हजार २९३ क्विंटल सोयाबीन बियाण्याची गरज आहे. रासायनिक खतांचा पुरवठाही पुरेशा प्रमाणात राहणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. जिल्ह्यासाठी कापूस बियाण्यांच्या १ लाख ५२ हजार पाकीटांची आवश्यकता आहे.

बैठकीत हळद प्रशिक्षण व संशोधन केंद्र, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, राष्ट्रीय अन्न व पोषण अभियान, प्रधानमंत्री सौर कृषी पंप योजना, वैयक्तिक शेततळे, फळबाग योजना, डिजिटल शेती शाळा, माती परीक्षण, महाडीबीटीवरील अर्जवाढ, हिरवळीच्या खतांचा वापर, पिक स्पर्धा, बायोचार योजना, हुमनी कीड नियंत्रण, बीबीएफ पद्धत, शेतकऱ्यांचे व्हॉट्सअॅप गट तयार करून त्यांच्यामध्ये जनजागृती आदी बाबींचा आढावा घेण्यात आला.

यावेळी आमदार तानाजी मुटकुळे यांनी जिल्ह्यात सोयाबीन हे मुख्य पीक आहे. परंतु सोयाबीनला भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांनी मका पिकाकडे वळला पाहिजे. यामुळे जनावरांना वैरण सुध्दा उपलब्ध होते. यासाठी शेतकऱ्यांना मका पिकांकडे वळविण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगून हरभरा पिकाचा पिक विमा मिळण्यासाठी सर्व मंडळे समाविष्ट करुन प्रस्ताव पाठवावा. तसेच शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा बियाणे व खताची लिंकींग होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच राखीव साठाही मागणीनुसार तयार ठेवावा, अशा सूचना केल्या.

यावेळी कृषि विज्ञान केंद्रामार्फत दि. २९ मे ते १२ जून, २०२५ या कालावधीत विकसित कृषी संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानामध्ये कृषी सुवर्ध समृध्दी रथाद्वारे जिल्ह्यातील ९० गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राजेश भालेराव यांनी दिली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर खरीप हंगामपूर्व आढावा सादर केला. शेवटी उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.